***कलकत्त्यात तसलिमा नासरिन***

बांगला देशी लेखिका तसलिमा नासरिन ता. २९ ऑक्टोबर रोजी कलकत्त्याला आल्या. आपली बॅटरी चार्ज करून घेण्यासाठी मी इथे आले आहे असं त्या म्हणाल्या.

ढाक्याहून पळून जावं लागलं त्यानंतर तब्बल सहा वर्षांनी ह्या इकडे आल्या आहेत. 'मात्र मी बांगला देशमध्ये जाऊ शकत नाही कारण तिते माझ्या लेखनामुळे प्रक्षोभक वातावरण निर्माण झालेलं आहे. असं त्यांनी सांगितलं.

' म्हणूनच कलकत्ता ही एकच जागा अशी उरली आहे की जेथे मी खास बंगाली अड्डा अनुभवू शकेन आणि स्वत:चा पुन्हा एकदा शोध घेऊ शकेन.' त्या म्हणाल्या.

त्यांची दोन पुस्तके - 'लज्जा' आणि 'आमार मेयेबेला' (माझं बालपणं ) प्रसिद्ध झाल्यानंतर बांगलादेशी सरकारने त्यांना देशात पदार्पण करण्यास बंदी घातली.

त्यांची फ्लाइट मुंबईला पोचली तेव्हा विश्वसुंदरी सुस्मिता सेन त्यांना एअर पोर्टवर भेटली. 'घरी परतल्याचा आनंद आज मला होत आहे, ' त्या म्हणाल्या.

त्या आता नवी कादंबरी लिहायला घेणार आहेत. बरीच वर्षे परदेशात काढल्यानंतर पाश्चात्य स्त्रियांच्या परिस्थितीचे निरीक्षण त्यांना करता आले. म्हणून तिकडच्या स्त्रियांच्या परिस्थितीला अनुसरूनच त्यांचे नवे पुस्तक राहील.

सध्या त्या फक्त एक आठवड्यासाठी इथे आल्या आहेत. त्यांना खरे तर भारतात राहण्याची इच्छा आहे. जर भारत सरकारने त्यांना आश्रय देण्याचे मान्य केले तरच ते शक्य आहे.

सध्या त्या पॅरिस येथे वास्तव्य करून आहेत.

ता. ३ नोव्हेंबर रोजी येथील शिशिर मंचला त्यांच्या काव्यवाचनाचा बहारदार कार्यक्रम कवींच्या एका संस्थेने घडवून आणला. त्यांच्या कविता अंत:करणाला भावनिक स्पर्श करून जातात. त्या कविता करूण आहेत. त्यात देशप्रेम ओतप्रोत भरलेलं आहे. जुन्या आठवणींचा आढावाही आहे आणि मनाची सध्या होणारी तगमग, तळमळही व्यक्त झालेली आहे. श्रोतृवृंद मुग्ध होऊन त्या कविता ऐकत राहिला. शेवटी कार्यक्रम आटोपल्यानंतर मी ही अनेकांप्रमाणे त्यांना भेटले. तुमचे पुस्तक मी अनुवादित करीत आहे असे सांगितले. व प्रस्तुत पुस्तकावर त्यांची स्वाक्षरी घेतली. आणखीही दोन पुस्तके मराठीत आली असल्याचे सांगितले. त्यांनी शेकहँड केला व मी त्यांचा निरोप घेतला, कारण माझ्या मागे अनेक जण त्यांच्या भेटीसाठी खोळंबलेले होते.

जानेवारी महिन्यात बुकफेअरच्या सुमारास इथे पुन्हा येण्याचा त्यांचा मानस आहे.

तारा पंडित



| | |
|---|---|
| इलेक्ट्रोलेड (पुणे) प्रायव्हेट लिमिटेड. | पुणे |
| अजब स्टोअर्स | निपाणी |
| संजयसिंह रामराम चव्हाण | |
| जी. एम. मेहता | डोंबिवली (इस्ट) |
| जवाहर क्लॉथ स्टोअर्स | मुरगुड |
| संतसंग परिवार | पुणे |
| श्रीराम वाचनालय | जालना |
| मा. शं. खळदकर | पुणे |
| प्रा. इश्वरदास मालवीय | मोर्शी (अमरावती) |
| दी फेडरेशन ऑफ एज्युकेशन पब्लिशर्स इन इंडिया | न्यू दिल्ली |
| आय बी एम आर | पुणे |
| साकेत प्रकाशन | औरंगाबाद |
| फ्रँक ब्रदर्स अँड को. (पब्लिशर्स) लि. | न्यू दिल्ली. |
| मॅट्रिक्स, बिझीनेस मशीन्स् प्रा. लि. | पुणे |
| इरेश स्वामी | सोलापूर |
| हॉटेल श्रेयस | पुणे |
| पराग प्रकाशन | मुंबई |
| कॉन्टिनेन्यल प्रकाशन | पुणे |
| पुष्प प्रकाशन | पुणे |
| प्रशांत हेमके | वर्धा |
| द. ता. भोसले | पंढरपूर |

# संपादकीय

## रियासतकारांचे अजोड कर्तृत्व

भारतीय इतिहासाचे सुमारे नऊशे वर्षांचे अभ्यासपूर्ण अध्ययन रियासतकार गो. स. सरदेसाई यांनी आपल्या मुसलमानी, मराठी व ब्रिटिश रियासतींद्वारे घडवले आहे. एवढा प्रचंड आवाका त्यांच्या आधी कोणी दाखवला नव्हता. १८९८ साली मुसलमानी रियासतींची पहिली आवृत्ती प्रसिद्ध झाली. १९०२ मध्ये मराठी रियासतींचे प्रकाशन सुरू झाले; ब्रिटिश रियासतींचे दोन खंड १९४४ साली निघाले. त्यानंतरही या सर्व रियासतींच्या माहितीत नवी भर घालून, त्यांचे पुनर्लेखन करण्याचे त्यांचे काम चालूच राहिले. २९ नोव्हेंबर १९५९ रोजी त्यांचे वयाच्या ९४ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या मृत्यूला ४० वर्षे झाली आहेत, परंतु अजूनही त्यांच्या रियासतींचे महत्त्व अबाधित आहे. त्यांच्या तोडीस तोड असे इतिहास ग्रंथ मराठीत निर्माण झालेले नाहीत. १९९३ साली त्यांच्याच मूळ रियासती नवीन उपलब्ध संशोधनाच्या पुरवण्या जोडून पॉप्युलर प्रकाशनतर्फे प्रसिद्ध करण्यात आल्या. न्यू हिस्टरी ऑफ मराठाज्‌चे तीन खंड, मेन करन्ट्स्‌ ऑफ मराठा हिस्टरी हे त्यांचे ग्रंथही विख्यात आहेत. पेशवे दप्तराचे पंचेचाळीस खंड त्यांनी प्रकाशित केले. जदुनाथ सरकार यांच्या मदतीने पूना रेसिडेन्सी कॉरस्पॉन्डन्सचे पाच खंडही त्यांनी संपादित केले. साडेतीनशेवर लेख लिहिले. १९३८ मध्ये मुंबई साहित्य संमेलनाचे अध्यक्ष स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी रियासतकारांचा गौरव करताना म्हटले, ''मराठीतच काय पण मी स्वानुभवाने सांगतो की हिंदुस्थानच्या नि विशेषत: मराठी साम्राज्याच्या इतिहासावर असा ग्रंथ बंगाली, हिंदी, प्रभृती प्राकृत भाषांमध्ये वा इंग्रजीमध्येही झालेला नाही.''

चाळीसाव्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई यांच्या अनुपलब्ध असणाऱ्या रियासतींचे पुनर्मुद्रण होण्याच्या योजनेला चालना मिळायला हवी.

## पुण्यातील आद्य ग्रंथ विक्रीकेंद्र

पुण्यनगरीतील सिटी पोस्टासमोरील गोडबोले बुकसेलर्स या संस्थेला ग्रंथविक्रीचे पुण्यातील आद्यकेंद्र म्हणून मान दिला पाहिजे. १८१० साली अप्पाजी भास्कर गोडबोले हे कोकणातून पुण्याला आले. शनिवारवाड्याजवळ त्यांनी विविध वस्तूंचे दुकान काढले.



पुण्यातील विद्वज्जनांची पोथ्यांची मागणी लक्षात घेऊन राजस्थानी कलाकारांकडून वेगवेगळ्या पोथ्या लिहून घेऊन त्या विकण्यास त्यांनी आरंभ केला. त्या काळातही देशी पोथ्यांपेक्षा राजस्थानी पोथ्या अधिक आकर्षक व स्वस्त असत. पुढे विश्रामबागवाड्यात दोलामुद्रित तंत्राने पोथ्यांची निर्मिती होऊ लागली. त्यानंतर शिळाप्रेसचा (लिथो) जमाना आला. बदलत्या मुद्रण तंत्राचा वापर करून पोथ्यांची निर्मिती व विक्री करण्यात गोडबोले यांनी आपले स्थान भरभक्कम केले.

१८५१ मध्ये विश्रामबागवाड्यात पुस्तकांची छपाई करण्याची यंत्रणा दक्षिणाप्राइझ कमेटीने उभारली. अप्पाजी भास्कर गोडबोले यांचे सुपुत्र नारो अप्पाजी (नारायण) यांनी १८५८ मध्ये वृत्तप्रसारक हा स्वत:चा छापखाना सुरू केला. पंचोपाख्यान वगैरे धार्मिक गोष्टींची पुस्तके त्यांनी काढली. स्वत:चे जाहिरातपत्रही चालवले. चमत्कारिक गोष्टी (१८६३), भोज व कालिदास (१८६६) ही त्यांची पुस्तके चांगली खपली. खिळेछाप छपाईचा जमाना आल्यावर नारो अप्पाजी यांनी काळ्या शाईत चरबीऐवजी तूप वापरून छपाईला चमकदारपणा आणण्याचे तंत्र विकसित केले; आणि सोवळ्यात वाचण्याजोगे गुरुचरित्र प्रसिद्ध करून पुण्याच्या विद्वज्जनांना आश्चर्यचकित केले. इंदुप्रकाश या वृत्तपत्रात २८ ऑक्टोबर १८७० रोजी दिलेल्या जाहिरातीत आठ रुपयांचे पुस्तक ३१ डिसेंबर १८७० पर्यंत सवलतीत पाच रुपयांना देण्यात येईल असे म्हटले होते.

१८९० मध्ये नारो अप्पाजी गोडबोले यांचे देहावसान झाले. त्यांचे एक पुत्र लक्ष्मण नारायण गोडबोले यांनी सध्याचे सिटीपोस्टासमोरचे दुकान १९१२ साली सुरू केले. शाळाकॉलेजची पुस्तके, धार्मिक पुस्तके याचबरोबर विद्यार्थ्यांना लागणारे साहित्यही या दुकानात मिळत असल्याने ग्राहकांना ते प्रिय झाले. अनेक धार्मिक पुस्तके त्यांनी नामवंत अभ्यासकांच्या मदतीने त्यांनी प्रसिद्ध केली; आणि मुंबईच्या निर्णयसागर प्रेसप्रमाणेच आपला दबदबा प्रस्थापित केला.

१९४७ पासून या पुस्तक विक्री व्यवसायात त्यांचे पुत्र माधवराव यांनी लक्ष घातले. त्यांचे चुलत बंधू कोंडो भास्कर त्यांच्या मदतीला आले. १९९१ पासून माधवरावांचे पुत्र संजय गोडबोले यांनी या दुकानाची जबाबदारी अंगावर घेतली. त्यांना स्वत:ला विविध दुर्मिळ वस्तू जमवण्याचा छंद असल्याने जुन्या पुस्तकांच्या संग्रहाकडेही लक्ष दिले. आजही या दुकानात जुन्या पोथ्या व पुस्तके यांची चौकशी करायला लोक येतात आणि संजय गोडबोले त्यांना योग्य ते मार्गदर्शन करतात.

पुण्यातील ग्रंथविक्री क्षेत्रातील आद्य केंद्र म्हणून गोडबोले कुटुंबाने आपले स्थान निर्माण केले आहे. नव्या झगमगाटापासून अजून स्वत:ला अलिप्त ठेवले आहे. आधुनिकीकरणाच्या या जमान्यात कात टाकून नवे रूप नवे तेज धारण करायला हवे. किमान दीडशे वर्षांची सलग परंपरा असलेले हे एकमेव ग्रंथ विक्री केंद्र असेल. नव्या सहस्रकात पदार्पण करताना त्याने पुन्हा कालोचित झेप घेण्याची जिद्द दाखवली पाहिजे. चरबी विरहित शाईने गुरुचरित्राचे मुद्रण करण्यात जी अभिनव कल्पकता दीडशे वर्षांपूर्वी नारो अप्पाजींनी दाखवली तशीच

ती नव्या इलेक्ट्रॉनिक इंटरनेटच्या आव्हान स्वीकाराबाबत दाखवली पाहिजे.

## इंटरनेटवर मराठी पुस्तके

यंदाच्या दिवाळी अंकांची सूची इंटरनेटवर श्रीमराठी डॉट कॉम या मराठी वेबसाइटवर उपलब्ध करून देण्याचा उपक्रम मुंबईच्या मनोज कुलकर्णी, सोनाली वासकर आणि माधव भोपे यांनी केला आहे. त्यांचेही अभिनंदन.

त्याचप्रमाणे प्रकाशनविश्व डॉट कॉम या वेबसाइटद्वारे मराठीतील उपलब्ध पुस्तकांची माहिती व मुखपृष्ठे शब्दसंपदा या सदरात संकलित करण्यात आली आहेत. विषयानुरूपही वर्गीकरण करण्यात आल्यामुळे त्या विषयावरील सर्व पुस्तकांची यादी व त्यांची माहिती विनासायास मिळू शकते. पुस्तकांच्या बरोबरच दिवाळी अंकांची माहिती ही 'दिवाळी अंक' या सदरात संकलित केलेली आहे. ' ध्यास मराठीचा... विश्वास मराठी माणसाचा' हे उद्दिष्ट समोर ठेवून सफर, पत्रमित्र, उद्योग संस्था, मनमोहक (सौंदर्यसाधना), करमणूक (नाटक सिनेमाची माहिती) अशी सदरे या वेबसाइटवर देण्यात येणार आहेत. हाही एक चांगला उपक्रम आहे. आम्ही त्याला शुभेच्छा देतो.

सुनील मेहता

\- संपादक


# ग्रंथप्रेमी योजना !

**ग्रंथप्रेमींसाठी खुषखबर !**

**ऑक्टोबर** '९९ पासून **मार्च** २००० पर्यंत **१०००** रुपये भरल्यास आपल्याला **१५००** रुपयांची आपल्या पसंतीची पुस्तके **मार्च २०००** मधे मिळतील. (मात्र या योजनेमधे स्वामी, श्रीमान योगी, रुचिरा भाग १ व भाग २ ही पुस्तके अंतर्भूत नाहीत.)

**त्वरा करा.**

**आजच सभासद व्हा व दर्जेदार पुस्तके घरपोच मिळवा.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस**, १२१६ सदाशिव पेठ, पुणे ३०. ✆ ०२०-४४७६९२४

# साहित्यवार्ता

**एप्रिलमध्ये बेळगावला अ. भा. मराठी साहित्य संमेलन**

दादरच्या साहित्य संमेलनाबद्दल बराच वाद झाल्यामुळे पुढच्या संमेलनाचे आमंत्रण देण्यासाठी कोणतीच संस्था पुढे आली नाही. त्यामुळे नोव्हेंबर-डिसेंबर मध्ये नेहमीप्रमाणे साहित्यसंमेलनाचे आयोजन होऊ शकले नाही. तेव्हा बेळगावच्या सार्वजनिक वाचनालय या संस्थेने आपल्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्षाचे निमित्त साधून हे संमेलन बेळगावला भरवावे असे अ. भा. मराठी साहित्य संमेलन महामंडळाने आवाहन केले. त्याला या संस्थेने अनुकूलता दर्शविली आहे. वाचनालयाचे अध्यक्ष रतन रजपूत यांनी सीमाभागातील मराठी अस्मितेचे दर्शन घडवून येथील मराठी भाषा टिकवण्यासाठी साहित्य संमेलनाचे आमंत्रण स्वीकारल्याचे स्पष्ट केले. आता रीतसर अध्यक्षीय निवडणूक वगैरे प्रक्रिया सुरू होईल.

**बल्लारपूरला आंबेडकरी साहित्य संमेलन**

बल्लारपूर येथे १५ व १६ जानेवारी रोजी पाचवे अ. भा. आंबेडकरी साहित्य संमेलन होणार आहे. नाशिकच्या आंबेडकरी साहित्य संसदेच्या वतीने होणाऱ्या या संमेलनात अण्णाभाऊ साठे वाङ्मय पुरस्कारही देण्यात येईल. परिसंवाद, पथनाट्ये, कथाकथन, कविसंमेलन, चित्रप्रदर्शन वगैरे कार्यक्रमांबरोबर आरक्षण धोरणावरही चर्चा यावेळी होईल. (संपर्क : पवन भगत, अध्यक्ष, आंबेडकरी साहित्य संमेलन, रवींद्रनगर, बल्लारपूर ४४९७०१ जि. चंद्रपूर. फोन ४००४३).

**नामदेवांचे जन्मस्थान : राष्ट्रीय स्मारक**

नर्सी (नामदेव) हे संत नामदेव यांचे जन्मस्थान. तेथे त्यांचे राष्ट्रीय स्मारक उभारण्यासाठी नामदेव मंदिर संस्थान व संत नामदेव गुरुद्वारा संस्थान यांच्या सहकार्याने हिंगोली येथील जिल्हाधिकाऱ्यांनी प्रयत्न चालवले आहेत. या वर्षी संत नामदेवांचा षटशतकोत्तर संजीवन सोहळा साजरा होत आहे. पंजाबमध्ये घोमान, भूतविंड, मरड (जि. गुरुदासपूर), भट्टीवाल, धालीवालनगर इत्यादी ठिकाणी त्या निमित्त कार्यक्रम होणार आहेत. लंडनमध्येही एक कार्यक्रम आयोजित केला गेला आहे. संत नामदेवांच्या जन्मस्थानाच्या इमारतीत राष्ट्रीय स्मारक व्हावे असे ठरविण्यात आले आहे.

**बेगम अख्तर म्हणजे एक गाणेच : हृदयनाथ**

''ज्येष्ठ गझल गायिका बेगम अख्तर यांच्याविषयी डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी यांनी



एवढे समरसून लिहिले आहे, की त्यांचे पुस्तक म्हणजे एक गाणेच झाले आहे. त्यातून संगीतमय सूरच ऐकू येतात,'' असे मत ज्येष्ठ संगीतकार हृदयनाथ मंगेशकर यांनी व्यक्त केले.

'मानसन्मान प्रकाशन'तर्फे प्रसिद्ध करण्यात आलेल्या 'बेगम अख्तर' या पुस्तकाचे प्रकाशन त्यांनी केले. बेगम अख्तर यांच्या पंचविसाव्या स्मृतिदिनाचे निमित्त साधून डॉ. वसंतराव देशपांडे प्रतिष्ठानने हा कार्यक्रम आयोजित केला होता.

''बेगम अख्तर अतिशय नम्र होत्या; पण आपल्या क्षेत्रात विद्वान होत्या. गझलगायकीमध्ये त्यांचा हात धरणारा कोणी नव्हता. त्यांच्याविषयी डॉ. नाडकर्णी यांनी इतके समरसून लिहिले आहे की वाटते, हे पुस्तक उलटे धरून हलविले तर त्यातून सूर आणि शेर खाली गळून पडतील! त्यातून संगीतच ऐकू येते. शेराचा अर्थ न कळताही तो शेर समजू लागतो. हेच या पुस्तकाचे यश आहे. बेगम अख्तर यांनी आपल्याला गाताना 'गळ्यात पत्री लावायला' शिकविले,'' असेही हृदयनाथ म्हणाले.

डॉ. नाडकर्णी यांनी सांगितले की डॉ. लता देव यांच्या साथीने अवघ्या पंधरा दिवसांत हे पुस्तक लिहून प्रसिद्ध झाले.

**वैचारिक असहिष्णुतेचे चित्र बदलण्याची गरज**

''महाराष्ट्रात काही अपवाद वगळता वैचारिक असहिष्णुता मोठ्या प्रमाणात असून, हे चित्र बदलण्याची गरज आहे,'' असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. द.



डावीकडून प्रकाशक सुनील मेहता, लता मंगेशकर, श्रीकांत तापडिया, सुलोचनासमवेत कांचन घाणेकर

'मेहता पब्लिशिंग हाऊस'तर्फे प्रकाशित **'रेशीमगाठी'** या कांचन घाणेकर लिखित व्यक्तिचित्रांच्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या हस्ते अभिनेत्री सुलोचना यांच्या निवासस्थानी दिनांक २५ ऑक्टोबर ९९ रोजी पार पडला.

समारंभास प्रकाशक सुनील अनिल मेहता, लेखिका कांचन घाणेकर,चारुकाका सरपोतदार, प्रभाकर पेंढारकर इत्यादी मंडळी उपस्थित होती.

ना. धनागरे यांनी पुणे येथे व्यक्त केले.

भारतीय समाजविज्ञान मंडळाच्या वतीने डॉ. धनागरे यांच्या हस्ते शेषराव मोरे (डॉ. आंबेडकरांचे सामाजिक धोरण-एक अभ्यास) आणि सी. पं. खेर (आर्थिक सुधारणांचे नवे पर्व) यांना प्रत्येकी पाच हजार रुपयांचे पुरस्कार देण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत प्रा. ग. प्र. प्रधान होते.

हे दोन्ही लेखक गुणवत्तेत सरस असूनही उपेक्षित राहिले आहेत, अशी खंत डॉ. धनागरे यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, ''आज पुरस्कार मिळालेले ग्रंथ दर्जेदार आहेत. श्री. मोरे यांनी आपल्या पुस्तकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखनातील अंतर्विरोध धाडसाने मांडला आहे. बाबासाहेबांवर वैचारिक एकाधिकार सांगणाऱ्यांना या लेखकाने एक प्रकारे आव्हान दिले आहे. तथापि, सध्या वैचारिक साहित्याबद्दल समाजात अतिशय उदासीनता दिसून येते. असे लिखाण करणे म्हणजे आजच्या युगात प्रवाहाविरुद्ध पोहण्याचा प्रकार ठरतो. ही परिस्थिती बदलण्याची गरज आहे.''

आज पुरस्कार मिळालेल्या आपल्या पुस्तकाचे प्रकाशन करताना किती अडचणी आल्या याचे शेषराव मोरे यांनी कथन केले. हा ग्रंथ लिहिल्याबद्दल माझ्यावर मानसिक दबाव आणण्याचे प्रयत्न काहीजण अजून करीत आहेत.''

ललितेतर लेखनाला फारसे प्रोत्साहन मिळत नाही, अशी खंत श्री. खेर यांनी व्यक्त केली. समाजविज्ञान संस्थेचे संचालक स. मा. गर्गे यांनी प्रास्ताविक केले.

**समाजाने स्त्रीवादाकडे डोळसपणे बघितले पाहिजे**

मनुष्य खऱ्या अर्थाने सुखी झाला तर त्याचे श्रेय स्त्रीकडेच जाईल. मात्र त्यासाठी समाजाने स्त्रीवादाला डोळस नजर दिली पाहिजे, असे विचार रा. ग. जाधव यांनी व्यक्त केले.

'तेजस्वला' या ज्योत्स्ना चांदगुडे रचित काव्यसंग्रहाचे प्रकाशन आमदार प्रा. रामकृष्ण मोरे यांच्या हस्ते झाले. व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर, लेखक रवींद्र पिंगे, समीक्षक शंकर सारडा, कवयित्री प्रा. डॉ. अश्विनी धोंगडे आदी उपस्थित होते.

प्रा. जाधव पुढे म्हणाले की, स्त्री ही मागासलेली राहिली आहे. तिच्यात परिवर्तन झाले पाहिजे. महाराष्ट्रात १५-२० वर्षात प्रभावी स्त्रीचे नेतृत्व दिसत नाही अशी खंत त्यांनी व्यक्त केली. स्त्रीने संस्कृतीची अधोगती थांबवावी. कवयित्रीने लिहिताना व्यक्तिवादी व सामाजिक अशा बाजूंचा विचार करावा- स्त्री जरी मुक्त झाली असे भासत असले तरी मुक्तीची क्षितिजे मर्यादित असतात, म्हणून समाजस्वास्थ्य, समाजाची स्वप्ने या सर्वांचे नाते आहे, ही धारणा ठेवून विचारप्रणाली आत्मसात करावी, तरच पुढील पिढीमध्ये बदल घडून येईल.

प्रा. रामकृष्ण मोरे म्हणाले, स्त्रियांची भूमिका नेहमीच पुरुषांना सुखावणारी व त्यागाला कुरवाळणारी असते. स्त्रीच्या भावनेत सोशिकतेचे अनेक स्तर असतात. पुष्प प्रकाशनचे विनोद सोनवणी यांनी प्रास्ताविक केले तर कवी अनिल कांबळे यांनी सूत्रसंचालन केले.



**'पुलोत्सव'**

'पु. ल. बहुरूपी - ८०' या सांस्कृतिक उपक्रमाचा सांगता सोहळा 'पुलोत्सव' या कार्यक्रमाद्वारे २४ ऑक्टोबर ते ८ नोव्हेंबर दरम्यान आयोजित केला गेला.

पु. ल. देशपांडे यांनी ८ नोव्हेंबर रोजी वयाची ८० वर्षे पूर्ण केली. त्यानिमित्त 'पुलोत्सव' मधील कार्यक्रमांत २४ ते ३० ऑक्टोबर दरम्यान चित्रपट महोत्सव व १ ते ८ नोव्हेंबर दरम्यान सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले गेले.

२४ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध हिंदी चित्रपट निर्माते दिग्दर्शक यश चोप्रा यांच्या हस्ते चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन झाले. गुळाचा गणपती, पुढचे पाऊल व देवबाप्पा या पुलंनी दिग्दर्शन वा अभिनय केलेल्या चित्रपटाशिवाय इन्स्पेक्टर जनरल (अंमलदार), पिग्मॅलियन (ती फुलराणी), थ्री पेनी ऑपेरा (तीन पैशांचा तमाशा) अशा चित्रपटांचा समावेश होता.

१ नोव्हेंबर रोजी 'पुलोत्सवा'च्या सांस्कृतिक सोहळ्याचे उद्घाटन प्रसिद्ध व्यंगचित्रकार आर. के लक्ष्मण यांच्या हस्ते झाले. महोत्सवाची सांगता पं. भीमसेन जोशी यांच्या मैफिलीने अभिनेते कमल हसन यांच्या उपस्थितीत झाली. वाऱ्यावरची वरात, सुंदर मी होणार, शतरंज के मोहरे ('तुज आहे तुजपाशी'चे हिंदी रूपांतर) ही नाटके, तसेच बैठकीची लावणी, भावसंगीताची वाटचाल, वैभव नाट्य संगीताचे, बालगंधर्वांची गायकी व बिल्हण असे संगीतविषयक कार्यक्रम आणि मैफिलींचे आयोजन करण्यात आले. आर. के. लक्ष्मण यांची मुलाखत, मराठी माणूस हिंदी सिनेमाकडे, साहित्यिकांचे संवाद व 'बहुरूपी पुलं' हा विशेष दृक्-श्राव्य कार्यक्रम सादर केला गेला. विजय तेंडुलकर, नाना पाटेकर, रीमा लागू, अमोल पालेकर, मोहन जोशी, भारत दाभोळकर, डॉ. श्रीराम लागू, रमेश तलवार, दिलीप प्रभावळकर, भक्ती बर्वे, द. मा. मिरासदार, आनंद यादव, मधु मंगेश कर्णिक, गजानन वाटवे, यशवंत देव, अरुण दाते, श्रीधर फडके, डॉ. अशोक दा. रानडे, प्रशांत दामले, मृणाल देव, कौशल इनामदार, मंगला गोडबोले, दीपा कार्येकर, श्रीकांत मोघे, रवींद्र साठे, मुकुंद फणसळकर, अपर्णा संत आदी साहित्यिक कलाकार गायक सहभागी झाले होते.

बालगंधर्व कला दालनात रवी परांजपे, शरद कापूसकर, वसंत सरवटे, सुभाष अवचट, दिलीप कुलकर्णी व सतीश पाकणीकर यांच्या साहित्यिक व्यक्तिचित्रांचे, शिल्पाकृती व प्रकाशचित्रांचे विशेष प्रदर्शन भरविण्यात आले.

**विजय चोरमारे यांना काव्य पुरस्कार**

कोल्हापूर सकाळमधील वार्ताहर विजय चोरमारे यांच्या 'शहर मातीच्या शोधात' या काव्यसंग्रहाला खानापूर तालुक्यातील श्री सुब्रमण्यम अकादमीतर्फे पुरस्कार माचीगड येथे भरलेल्या ग्रामीण साहित्य संमेलनाच्या वेळी दि. १४ नोव्हेंबर रोजी देण्यात आला.

धारवाडच्या कर्नाटक विद्यापीठातील मराठी विभागप्रमुख डॉ. बाबूराव गायकवाड यांच्या स्पंदन या काव्यसंग्रहाचाही गौरव यावेळी करण्यात आला.

## मुंबईत मराठीचा वापर कमी होत आहे ही चिंतेची बाब

कोकण मराठी साहित्य परिषदेची शिवाजी पार्क-माहीम-प्रभादेवी ही नवी शाखा स्थापन करण्यात आली आहे. तिचे उद्‌घाटन ज्येष्ठ संगीतकार सुधीर फडके यांच्या हस्ते झाले. उत्तम संगीतरचना करण्यासाठी साहित्याची जाण असली पाहिजे असे त्यांनी म्हटले. मधु मंगेश कर्णिक यांनी मुंबईतून मराठीचे उच्चाटन होत आहे याबद्दल चिंता व्यक्त केली. ते म्हणाले, ''मुंबईत मराठी वाचवण्याची गरज निर्माण झाली आहे. महाराष्ट्रात मात्र सर्वत्र मराठीचा वापर होतो; तेव्हा मुंबई वगळता अन्यत्र मराठी भाषेची चिंता करण्याचे कारण नाही.''

## परभणी येथे नाट्यसंमेलन

आठ व नऊ जानेवारी २००० रोजी परभणी येथे होणाऱ्या नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी 'वऱ्हाड चाललंय लंडनला' या एकपात्री कार्यक्रमाचे सर्वेसर्वा प्रा. लक्ष्मण देशपांडे यांची निवड झाली आहे. नांदेड नंतर ३५ वर्षांनी मराठवाड्यात हे नाट्यसंमेलन होत असल्याने मराठवाड्यातील नाट्य चळवळीला त्यामुळे चालना मिळेल असा आशावाद नाट्य परिषदेच्या परभणी शाखेचे सचिव ॲड. अनंत उमरीकर यांनी व्यक्त केला. माजी मंत्री रावसाहेब जामकर हे या संमेलनाचे स्वागताध्यक्ष असतील.

## व्यंगचित्रकार प्रभाकर ठोकळ यांचे निधन

महाराष्ट्रातील व्यंगचित्रकलेचा चालताबोलता इतिहास अशी ख्याती असलेले आणि पन्नासावर वर्षे सतत व्यंगचित्र क्षेत्रात कार्यरत असलेले प्रभाकर ठोकळ यांचे अकोला येथे दि. १० नोव्हेंबर रोजी निधन झाले. त्यांचे वय ७२ वर्षे होते. कार्टूनिस्ट कंबाईन या संस्थेचे ते अध्यक्ष होते. महसूल खात्यात उपनिबंधकपदावरून ते सेवानिवृत्त झाले. त्यांच्या मागे दोन मुलगे व दोन मुली असा परिवार आहे.

## कारगिलच्या युद्धाबाबतची पुस्तके मराठीत हवीत

कारगिल येथील युद्धाचे विवेचन करणारी; तसेच राष्ट्रीय सुरक्षिततेच्या प्रश्नांविषयी सर्वसामान्यांना माहिती करून देणारी पुस्तके मराठी भाषेतून प्रकाशित करण्यात यावीत, अशी अपेक्षा शशिकांत पित्रे यांनी पुणे येथे व्यक्त केली.

युद्धभूमीवर वीरमरण पत्करणारे पिंगोरी येथील लान्स दाईक शंकर शिंदे यांच्या पत्नी श्रीमती छाया शिंदे यांच्या हस्ते मिलिंद वेर्लेकर यांच्या 'कारगिल : काय घडले, कसे जिंकले' या पुस्तकाचे, प्रकाशन झाले. हवाई दलाचे प्रमुख (निवृत्त) हृषिकेश मुळगावकर, ज्येष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

श्री. पित्रे म्हणाले, वेर्लेकर यांनी कारगिलविषयक बातम्यांचे संकलन करून चांगले पुस्तक तयार केले आहे. या इतिहासाची माहिती लोकांना दिली पाहिजे. सैन्यदलांविषयीची माहिती, तसेच राष्ट्रीय सुरक्षिततेच्या प्रश्नांविषयीची माहिती देणारी पुस्तके लिहिण्याची आवश्यकता आहे.''



श्री. मुळगावकर म्हणाले,''कारगिलमध्ये भारतीय सैनिकांनी अत्यंत अवघड स्थितीत समोरासमोर लढून पाकिस्तानी सैन्याला पराभूत केले, ही महत्त्वाची गोष्ट घडली. कारगिलमध्ये वीरमरण पत्करणाऱ्या; तसेच जखमी झालेल्या जवानांची आठवण आपण सर्वांनी ठेवली पाहिजे.''

श्री वेर्लेकर म्हणाले, ''कारगिलमध्ये युद्ध सुरू असताना भारतीयांच्या देशप्रेमाच्या भावना उच्च पातळीपर्यंत पोचल्या होत्या. मात्र, नंतर या घटनांचा हळूहळू विसर पडतो. त्याची माहिती पुढील पिढीला असावी या उद्देशाने वृत्तपत्रांत आलेल्या सुमारे ३५ हजार बातम्यांचे मी संकलन केले. संरक्षण खात्याकडून काही माहिती मिळविली.

## 'तहान' हा ग्रामीण कादंबरीचा पुढचा टप्पा - हातकणंगलेकर

''माणसं कशाकशाला बळी पडतात, त्याचे प्रत्ययकारी चित्रण 'तहान' या कादंबरीत आहे. ग्रामीण कादंबरीचा पुढचा टप्पा म्हणजे ही कादंबरी आहे.या कादंबरीची भाषा व शैली जिवंत वाटणारी, अपरिचित परंतु अस्सल आहे. '' अशा शब्दात प्रा. म. द. हातकणंगलेकर यांनी 'तहान' या कादंबरीचा गौरव केला.

मॅजेस्टिक प्रकाशनाचा 'जयवंत दळवी स्मृती-पुरस्कार (११,१११रु.) प्रा. देशमुख यांना प्रदान करण्यात आला.

प्रा. देशमुख म्हणाले : गुरुस्थानी असलेल्या लेखकाच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार हे मी माझं भाग्य समजतो. या पुरस्काराच्या निमित्ताने ग्रामीण भागातील घुसमटीचे चित्रण वाचकांसमोर आले हे मला महत्त्वाचे वाटते.

डॉ. मंगला आठलेकर, के. ज. पुरोहित आणि प्रा. वि. शं. चौघुले हे परीक्षक समितीचे सदस्य हजर होते. मॅजेस्टिक प्रकाशनाचे अशोक कोठावळे यांनी प्रास्ताविक केले.

## डॉ. इनामदार यांचे पंचाहत्तरीत पदार्पण

एस. एन. डी. टी. कॉलेजचे माजी प्राचार्य व संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. हे. वि. इनामदार यांनी पंचाहत्तरीत प्रवेश केल्याचा मुहूर्त साधून त्यांच्या अकरा पीएचडी विद्यार्थिनींनी 'प्रबंध एकादशी' हा ग्रंथ प्रकाशित केला. मंदा खांडगे यांनी संपादित केलेल्या व प्रतिमा प्रकाशनने काढलेल्या या पुस्तकात अकरा प्रबंधांची रूपरेखा देण्यात आली आहे. छायानिष्ठ, ज्ञाननिष्ठ आणि समाजनिष्ठ ही आचार्यांची जी तीन वैशिष्ट्ये विनोबांनी सांगितली आहेत, ती डॉ. इनामदार यांच्यामध्येही आढळतात असा त्यांचा गौरव समारंभाचे अध्यक्ष बाळासाहेब भारदे यांनी केला. अंजली सोमण यांनी आपल्या प्रबंधलेखनामागे इनामदारांचीच प्रेरणा असल्याचे नमूद केले. डॉ. इनामदारांनी ज्या पर्णकुटीत महर्षी कर्वे राहिले त्या पर्णकुटीत एसएनडीटीचा प्राध्यापक म्हणून आपणास काही वर्षे राहता आले याबद्दल धन्यता व्यक्त केली.

# पुरस्कार

**नाट्यलेखन पुरस्कार**

अकराव्या महाराष्ट्र राज्य व्यावसायिक नाट्यस्पर्धेत उत्कृष्ट लेखनाचे पुरस्कार सतीश तारे (ऑल लाइन क्लिअर), सुरेश चिखले (गोलपिठा) आणि केदार शिंदे (श्रीमंत दामोदर पंत) यांना देण्यात आले. 'गोलपिठा'ला दिग्दर्शन, नेपथ्य, वेशभूषा आणि रंगभूषा यांचेही पुरस्कार मिळाले.

**ना. धों. महानोर यांना नामदेव पुरस्कार**

''पद्मश्री ना. धों. महानोर यांचा संत नामदेव पुरस्काराने गौरव म्हणजे एका मातीने दुसऱ्या मातीचा केलेला गौरव होय,'' असे ग्रामीण कथालेखक प्रा. भास्कर चंदनशिव यांनी जामखेड येथे म्हटले.

स्वातंत्र्यसैनिक भाई फुटाणे प्रतिष्ठान, जामखेडतर्फे श्री संत नामदेव पुरस्कार वितरण समारंभ व कविता उत्सव पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. रजनीकांत आरोळे होते.

प्र. चंदनशिव पुढे म्हणाले, ''महानोरांसारखा कवी शेतकऱ्यांच्या कष्टाची परिभाषा, शेतकऱ्यांचे विविध प्रश्न शब्दबद्ध करतो, ही अभिमानास्पद बाब आहे. त्यांच्या लिहिण्यातील शेतकरी मूल्य लक्षात घेऊनच हा सन्मान करण्यात आला. महानोर यांच्या कवितेला अभंगाची लय, सूर आहे. लावणी ढंग आहे. ग्रामीण जीवन, तेथील निसर्ग ते उभा करतात. त्यांची रानातील कविता, पावसाळी कविता वेगळी आहे. दयाधनामधील महानोरांची परिभाषाही वेगळीच आहे. शेतकऱ्यांच्या सुख-दुःखाशी समरस होऊन ते लिहितात. त्यांचे ते आगळेपण आहे. '' असे मला वाटते.

श्री. महानोर म्हणाले, ''पद्मश्री, कृषिभूषण, वनश्री हे किताब मला मिळाले. त्या वेळच्या आनंदापेक्षा हा आनंद कणभर वेगळा आहे. कविता उत्सवास जमलेला श्रोतृसमुदाय पाहता, वाटते की मराठी भाषा मरणार नाही. खेड्यातील बोलीभाषेतून ती जिवंत राहणार आहे.''

आमदार रामदास फुटाणे यांनी प्रास्ताविक केले. १९८७ पासून भाई फुटाणे प्रतिष्ठानतर्फे संत नामदेव पुरस्कार दिला जात आहे. या आधी हा पुरस्कार पुरुषोत्तम पाटील (धुळे), भाऊसाहेब पाटणकर (यवतमाळ), वामन कर्डक (नाशिक), राजा मुकुंद (कंधार), वसंत सावंत (सावंतवाडी), रा. ना. पवार (सोलापूर), शाहीर साबळे (मुंबई), फादर फ्रॅन्सिस दिब्रिटो (वसई), शाहीर बापूराव विभुते (सांगली) यांना देण्यात आला आहे.

**राजेंद्र खेर यांना ना. ह. आपटे पुरस्कार**

पुणे मराठी ग्रंथालयाचा या वर्षाचा ना. ह. आपटे पुरस्कार राजेंद्र खरे यांना 'देह झाला चंदनाचा' या कादंबरीसाठी देण्यात आला. पांडुरंगशास्त्री आठवले यांच्यावरील ही चरित्रात्मक कादंबरी आहे. भक्ती ही सामाजिक शक्ती असल्याची जाणीव त्यांच्या स्वाध्याय परिवाराला पायाभूत आहे असे डॉ. प्र. ल. गावडे यांनी म्हटले. एक हजार रुपयांचा हा पुरस्कार आहे.

**आमी भालो नाइ**

**तुमी भालो ताको आमार देश -** तसलिमा नासरिन

शिशिर मंचचा परिसर. बाहेर लोकांची अलोट गर्दी. कडक पोलीस बंदोबस्त. या सगळ्या झुंडीमधून वाट काढीत रंगमंचाच्या दारापर्यंत पोहोचले, दारावरच्या लोकांनी हात पुढे केला. कार्ड? मी म्हटलं, कार्ड नाहीये.'

## शब्दकोडे

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| सु | धा | म | य | ग | यी | णी |
| कु | रं | | दी | ना | म | ल्या |
| मा | या | ज | प | ला | ण | क |
| र | द | है | न | ली | र | |
| सि | श | ति | नि | फा | कि | अ |
| या | दी | दी | रा | मी | रि | नि |
| इ | त्ला | र | त | कां | शि | श |

सोबतच्या चौकटीमध्ये एका '**बंडखोर**' लेखिकेच्या पुस्तकामधील १६ पात्रांची नावे आहेत ती व त्या लेखिकेचे नाव लिहून कळवा.

**रचनाकार**
मनोहर बांदेकर

बरोबर उत्तर पाठवणाऱ्यांपैकी लॉट टाकून येणाऱ्या पहिल्या तीन स्पर्धकांना प्रत्येकी शंभर रुपयांची पुस्तके बक्षीस. **उत्तरे पाठवण्याची मुदत - २० जानेवारी १९९९**

**आमचा पत्ता :** मेहता मराठी ग्रंथजगत १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०.





**वादग्रस्त लेखिका तसलिमा नासरिन यांनी कलकत्ता शहराला नुकतीच भेट दिली. त्यांच्या एका कार्यक्रमाचा हा वृत्तान्त.**

'मग प्रवेश नाही.'

'मी महाराष्ट्रातली लेखिका, जर्नालिस्ट आहे. नासरिनच्या पुस्तकाचा मी अनुवाद करते आहे. सुनील गंगोपाध्याय यांनी मला यायला सांगितलंय.' एका दमात मी म्हटलं.

'मग तुम्ही ग्रीनरूमकडे जा. तिथे सांगा काय ते.'

ग्रीनरूमकडे गेले. बरोबर माझा मुलगा फोटोग्राफर म्हणून. तिथेही पोलीस बंदोबस्त, अन् लोकांची तशीच गर्दी. अर्धेअधिक लोक केवळ तसलिमाला पाहायला आलेले. कारण कार्डाशिवाय आत प्रवेश नव्हता. मग आम्हीही त्या गर्दीत मिसळून गेलो.

तीन नोव्हेंबरच्या वर्तमानपत्रात 'आजचे कार्यक्रम' या शीर्षकाखाली बांगलादेशी लेखिका तसलिमा नासरिन यांचे भाषण व काव्यवाचन, स्थळ : शिशिर मंच, वेळ सायंकाळी साडेसहा वाजता. ही बातमी वाचली. खरं तर या कार्यक्रमाविषयी मला अगोदरच सुगावा लागला होता व तेथे जाण्याची योजना तयार होतीच. फक्त कार्डावरच प्रवेश दिला जाईल हे माहीत नव्हतं.

मी सरळ गेले तेव्हा वरील अनुभव आला.

साधारण अर्धा तास असाच गेला. मग संयोजकांपैकी एकाला अंदाजानं हेरलं व म्हटलं, कसंही करून मला आत प्रवेश द्या. मी महाराष्ट्रातल्या वर्तमानपत्रात या कार्यक्रमाबद्दल लिहिणार आहे.

थोडा वेळ तो काहीच बोलला नाही. त्यानं चक्क दुर्लक्ष केलं. मग का कोण जाणे, एकदम जवळ येऊन म्हणाला, 'तुम्हांला हा कार्यक्रम ऐकायचाय?'

'हो. अन् त्याविषयी महाराष्ट्रातल्या वर्तमानपत्रात लिहायचं पण आहे.' मी म्हटलं.

'ए, यांना समोरच्या गेटने आत घेऊन जा अन् यांची बसण्याची चांगली व्यवस्था कर.' त्याने एकाला हुकूम केला.

तो पुढे अन् त्याच्या मागोमाग आम्ही मी अन् माझा फोटोग्राफर मुलगा.

चला ! प्रवेश तर मिळाला काही वेळाने कार्यक्रमाला सुरुवात झाली.

माइकवरून आवाज आला, 'शुभ संध्या. कार्यक्रमाची सुरुवात संगीताने करीत आहोत.' १५-२० फोटोग्राफर्स सज्ज झाले. त्यांचे कॅमेरे मंचावर केंद्रित झाले. त्यात टीव्हीवाले, व्हिडिओवाले, प्रायव्हेट इ. सारेच समाविष्ट होते. मंचावर मध्यभागी मांडी घालून एका ओळीत चारजण बसलेले - सौमित्र मित्र, शंख घोष, तसलिमा नासरिन आणि सुनील गंगोपाध्याय. त्यांच्या थोडं पलीकडे, एक गायक नि त्याचा वाद्यवृंद ऐसपैस बसलेले. गाणं सुरू झालं, दोनतीन गाणी झाल्यानंतर सौमित्र मित्रांनी परिचयात्मक भाषण गेलं.

ते म्हणाले, ''मला आठवतं, अशीच एक कविसंध्या काही वर्षांपूर्वी आयोजित केली होती. तेव्हा नासरिननी आपल्या कविता वाचून सर्वांना भारावून टाकलं होतं. आज आपण पुन्हा त्यांच्या कविता ऐकणार आहोत. पण आता त्या जगप्रसिद्ध व्यक्ती आहेत. त्यांच्या कविता निश्चितच अधिक हलवून सोडणाऱ्या असतील. तसलिमा, तुम्ही लिहा, लिहीत राहा, आम्ही तुमच्याबरोबर आहोत. अशा अनेक कवि-संध्या तुमचं जीवन उज्ज्वल करतील - तुम्ही इथे पुन्हा पुन्हा येत राहा. तुमचं स्वागतच होत राहील.''





मग सुनील गंगोपाध्याय बोलले. म्हणाले, ''मी जास्त बोलणार नाही. आपण तसलिमाच्या कविता ऐकायला इथे जमलो आहोत. फक्त चार शब्द बोलून आवरतं घेतो. '' पुढे म्हणाले, ''आता सौमित्रने एक आठवण सांगितली. त्याही अगोदरची एक आठवण मी सांगतो. असंच एक कविसंमेलन आयोजित केलेलं होतं. सौमित्र माझ्याजवळ येऊन म्हणाला, बांगलादेशची मुलगी इथे आलेली आहे. तिला आपल्या कविता वाचून दाखवण्याची इच्छा आहे. तिला परवानगी द्यायची का?' तिला परवानगी मिळाली. तिने कविता वाचल्या. अपमान, अन्याय, अत्याचार याविरुद्ध आवाज उठविणाऱ्या तिच्या कविता ऐकून वाटलं, खरंच या मुलीमध्ये भयंकर साहस आहे. मग मी तिला म्हटलं, असं कर, तू स्त्रियांचं एक दल तयार कर. पुष्कळ स्त्रियांची तुला साथ मिळेल आणि मग सर्वांनी मिळून लढा द्या जबरदस्त. ती लगेच म्हणाली, नको, नको. मला अजिबात वक्तृत्व येत नाही, मी कशी दल स्थापन करणार? त्यापेक्षा मी एकटीच लढा देत राहीन. स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध, तोही माझ्या लेखनातून फक्त. नसरिन तशी लाजरी आहे अन् बोलण्याच्या बाबतीत थोडीशी भित्रीदेखील आहे. मला वाटतं, आता वेळ न घालवता आपण तिच्या



कविता ऐकू या.''

मग शंख घोषांनी तिला पुष्पगुच्छ अर्पण केला. संयोजकांतर्फे तिला भेटीदाखल चांदीची नौका, एक हस्तशिल्प आणि फुलं देण्यात आली.

त्या भेटीचा स्वीकार करायला ती उभी राहिली, तेव्हा तिची लोभसवाणी मूर्ती नजरेत भरली. चाळिशीच्या उंबरठ्यापर्यंत अजूनही न पोहोचलेली, पण जगभर कीर्ती संपादन केलेली, मध्यम उंचीची, बारीक अंगकाठीची, साडी नेसलेली, कपाळावर कुंकू लावलेली ही भोळीभाबडी स्त्री तिच्या होणाऱ्या कौतुकामुळे भारावून गेलेली दिसली. तिच्या आत एक ज्वालामुखी आहे, हे खरंच वाटेना, इतकी ती वरून शांत चेहऱ्याची, नजरेत कारुण्य असलेली अशी दिसली आणि मग ती खाली बसून स्पष्ट आणि भावपूर्ण स्वरात कविता वाचण्यास सज्ज झाली, जो स्वर ऐकण्यासाठी श्रोते कान टवकारून बसले होते.




तिने सुरुवात केली, ''नमस्कार. तुम्ही आज माझा जो सन्मान करताहात त्यासाठी खरोखर मी योग्य आहे का ? पूर्व बंगालवर माझं प्रेम आहे, तेवढंच पश्चिम बंगालवरही आहे, ढाक्यावर आहे, तेवढंच कलकत्त्यावरही आहे. कलकत्त्याने केलेलं माझं स्वागत पाहून मी खरोखर मुग्ध झाले आहे. खरं तर मी एक सामान्य व्यक्ती. अन्यायाविरुद्ध मी आवाज उठवला. तुमचं प्रेम मला प्रेरणा देतं. मी लिहीन, खूप लिहीन. समाज बदलण्याचं माझं स्वप्न होतं. तेच स्वप्न पुन्हा शोधतेय मी. नाही तरी माझ्या आजच्या निर्वासित जीवनामध्ये स्वप्नाखेरीज दुसरं आहेच काय? मी तुमचं निर्भेळ प्रेम ग्रहण करते. खरोखर धन्य आहे मी!''

आणि नंतर तिने काव्यवाचनाला सुरुवात केली -

पहिल्या कवितेचं शीर्षक होतं, 'कलकत्ता प्रिय कलकत्ता'! ज्यावेळी पासपोर्ट असूनही मला कलकत्त्याला येता आलं नाही तेव्हा मी ही कविता लिहिली, असं तिने सांगितले. ''कलकत्ता, कसा आहेस रे तू?'' - अशी तिने सुरुवात केली, ''तुला एकदा स्पर्श करायला मी आसुसले आहे रे, कधी दिसशील रे मला तू कलकत्ता ?''


अन् मग कलकत्त्यातल्या अनेक ठिकाणच्या अनेक आठवणी तिने त्या काव्यात गुंफल्या आणि श्रोत्यांना आपल्या पहिल्या कवितेने भारावून टाकलं. इतकं की टाळ्या वाजवण्याचं भानही कोणाला राहिलं नाही. विशेष म्हणजे,

तुडुंब भरलेल्या त्या सभागृहात नितांत शांतता होती, जणू तिथे कोणी माणसंच नसावीत. कुणाला खोकला नाही की कसले बारीकसारीक आवाजदेखील नाहीत. आवाज फक्त एकट्या तसलिमाचा !

पुढच्या दोन कविता अनुक्रमे 'अस्वीकार' आणि 'अंतरीन' अशी शीर्षकं असलेल्या, अंतरीनमध्ये ती म्हणते -

'एका अंधाऱ्या घरात आहे मी एकटी,
मृत्यूचा गंध घेते आहे, या अंधाऱ्या घरात एका कॉफिनमध्ये!'

आई आजारी होती. तसलिमाची वाट पाहत होती. निर्वासित झालेली तसलिमा आईच्या भेटीला जाऊ शकत नव्हती. त्या वेळी लिहिलेली 'माँ' ही कविता. पहिली ओळ वाचली मात्र, आणि ती एकदम स्तब्ध झाली. डोळे भरून आले. तोंडून शब्द फुटेना.



सुनील गंगोपाध्याय यांनी तिच्या पाठीवर हात फिरवला. मग सारं धैर्य एकवटून तिने गदगदलेल्या स्वरात ती संपूर्ण कविता वाचून काढली. श्रोतेदेखील गहिवरले.

या वर्षी जानेवारीमध्येच तिला यायचं होतं खरं तर. तेव्हाही असंच. ती येऊच शकली नाही. आई इकडे वाट पाहत होती. मग तिने कविताच लिहून काढली - 'आमार मायेर गल्प' (माझ्या आईची गोष्ट') हे त्या कवितेचं शीर्षक. आईबद्दलच्या अत्यंत उच्च भावनांनी ओतप्रोत भरलली ही कविता करुण आहे फार. आई मृत्यूशय्येवर पडलेली आहे, पण तिचा मृत्यूदेखील किती भव्यदिव्य असावा हे तसलिमानं कल्पनेनं रंगवलेलं चित्र म्हणजे ही कविता.

तसलिमा सतत सहा वर्षं परदेशात इथंतिथं वास्तव्य करीत असताना तिला घरी परतायची जबरदस्त ओढ लागली होती. कवितेच्या शब्दफुलांची पखरण करून ती आच तिने कमी केली. कवितेला शीर्षक दिलं, 'तब फिरबो ( तेव्हाच परत येईन.) या कवितेत तिने शंका व्यक्त केली, पण मी खरंच परत येईन का कधी ?

मग तिने परदेशात राहत असताना केलेल्या काही कविता वाचून दाखवल्या. एका कवितेत ती म्हणते -

'देश, तुमी कॅमोन आछो ?
अरे, माझे प्राण तडफडताहेत
तुझ्या भेटीसाठी. तुझे ?
अरे, मला नुसता तुझाच ध्यास लागला आहे? तुला ?''

पुढे ती म्हणते, 'आमी भालो नाइ, तुमी भालो ताको आमार देश !!'

एका कवितेत ती म्हणते -

'मी स्वत:च्या देशातही परकी झाले आहे, परदेशात तर मी परकीच आहे. मग माझा स्वत:चा देश कुठे बरं आहे? सगळ्यांचं काही ना काही असतं, कोणी ना कोणी असतं, माझं काहीही नाही, माझं कोणीही नाही. सतत परदेशी म्हणून जगण्यातच माझं जीवन चाललेलं आहे ! खूप वाटतं, ते जुनं सगळं अनुभवावं, तो भात खावा. इथे भात खाते, पण त्याला स्पर्श केला की जाणवतं हा बांगलादेशचा भात नाहीये. मन उदास होतं मग...'




'बाडी फिरबो' ही आणखी एक कविता महासागरातून खूप प्रवास झाला. आता घरच्या तळ्यामध्ये भर दुपारी डुंबावंसं वाटतं. तेच सगळं पूर्वीचं अनुभवावंसं वाटतं. अन् मग ती पूर्वीच्या आठवणी विस्तारानं सांगत राहते त्या कवितेत, लहानपण घालवलेल्या त्या परिसराचं वर्णन करीत राहते.

एका कवितेत लिहिते, 'स्कँडेनेव्हियाच्या हिवाळ्यात मला खूप एकटं एकटं वाटतं. असं वाटतं, इथं माझं कोणी नाही, माझा स्वत:चा देश नाही, माझं शरीर माझं नाही, माझं हृदयदेखील माझं नाही. कुठे वाहत जाणार माझं हे जीवन? आता मला या स्कँडेनेव्हियातून काढून ने, मला वाचव!'

'मसजिद मंदिर' नावाच्या कवितेत सर्व धर्म समान असल्याची भावना व्यक्त करून ती म्हणते, 'आजपासून मनुष्यत्व हाच धर्म होऊ दे' ही माझी प्रार्थना आहे.

आणि मग शेवटची कविता तिने वाचली. 'शीर्षक - १५०० साल.' (बंगाली कॅलेंडरप्रमाणे) - तिच्या म्हणण्याचा अर्थ. - आणखी १०० वर्षानंतर. त्या काळात परिस्थिती कशी असेल, हे तिने कल्पनेने रंगवलेलं चित्र शब्दबद्ध केलं आहे.

'ही कविता
जेव्हा ते वाचतील ( त्या पिढीचे लोक)
तेव्हा जगात मुक्त प्रेम असेल.
आजची कोणतीच परिस्थिती

तेव्हा असणार नाही.
जेव्हा वाचतील ते ही कविता
तेव्हा शंभर वर्षापूर्वी
कशी परिस्थिती होती
ते त्यांना कळेल.'

तसलिमाचं काव्यवाचन संपलं. गाण्याने सुरुवात झालेल्या कार्यक्रमाचा शेवटही गाण्यानेच झाला. नंतर गर्दीतून वाट काढीत मीही इतर काहीजणांप्रमाणे तिच्यापर्यंत पोचले. सुनील गंगोपाध्याय यांनी 'ही महाराष्ट्रातली लेखिका' म्हणून ओळख करून दिली. दोन दोन शब्दांची देवाणघेवाण झाली. तिने शेकहँड केला आणि इतरांना तिला भेटण्याची संधी देऊन मी तडक निघाले.

ती संध्याकाळची स्मृतीही माझा पाठलाग करीत माझ्याबरोबर घरी आली.

**- तारा पंडित**

---

*'कुठल्याही अन्यायाला, शिष्टाचार म्हणून टाळणं, अपराध्याऐवजी स्वत:च शरमिंद होणं, किंवा सगळ्या छळाबद्दल मनातल्या मनात समाजव्यवस्थेला दोष देऊन मान खाली घालून निघून जाणं, आता स्त्रियांनी सोडून दिलं पाहिजे. स्त्रियांनी आता वळून पाहायला शिकलं पाहिजे. कानावर वाईटसाईट बोलणं पडलं तर जिला ऐकावं लागलं ती स्त्री कोणत्याही वयाची असेना तिने थांबून, वळून, उद्धटपणे, धीट होऊन, त्या पुरुषाकडे मग तो कोणत्याही वयाचा असेना, पाहिलं पाहिजे. स्त्रियांनी आता ओरबडायला शिकलं पाहिजे.*

*वळून पाहण्याची सवय स्त्रियांना नाही. त्या चालताना सर्व त्रास, आपत्ती घरापर्यंत वाहून नेतात, सगळ्याबद्दल स्वत:ला वा नियतीला दोष देऊन रडतात. राग, संताप रडून घालवतात. संतापाला एकत्र बांधून विस्फोट करत नाहीत. पण आता विस्फोटाची जरूरी आहे. धक्का बसल्याशिवाय कुणी जागृत होत नाही. आता सर्वांच्या मंद झालेल्या बुद्धीवर दगड मारून लक्ष्यवेध करायला हवा. आणि ही जबाबदारी अन्य कुणाचीही नाही.'*

*तसलिमा नासरिन यांच्या 'निर्बाचित कलाम' या पुस्तकातून*




# पुस्तक परिचय

## महात्मा

**डॉ. रवींद्र ठाकूर**

**क्रांतदर्शी विचार, जीवनकार्य आणि प्रभावी व्यक्तिमत्त्व**

महात्मा जोतीराव फुले यांची चरित्रकहाणी सांगण्यासाठी कथात्मक ललित माध्यमाचा डॉ. रवींद्र ठाकूर यांनी वापर कलेला आहे. त्यंचे विचार व्यक्तिमत्त्व आणि जीवनकार्य वाचकांना या ललित कृतीतून अधिक आत्मियतेने समजावून घेणे शक्य होइल. ''आधुनिक जगाला महाराष्ट्राने केवढा मोठा माणूस दिला आहे याची जाणीव अजून तरी महाराष्ट्राचा अभिमान बाळगणाऱ्या लोकांना फारशी नाही'' असे डॉ. ठाकूर यांना वाटते. शेती सुधारणा, धंदेशिक्षण, तंत्रशिक्षण, पर्यावरण, आरक्षण, अस्पृश्यता निवारण, देवदासीप्रथा निर्मूलन, अंधश्रद्धा निर्मूलन, स्त्रीशिक्षण व स्त्रीसमता वगैरे विषयांवर गेल्या शतकात जोतीबांनी लिहिले. त्या काळाच्या मानाने त्यांची दृष्टी ही अधिक भविष्यवेधी होती असेच म्हणावे लागते. आजही या प्रश्नांची चर्चा संपलेली नाही. हे जोतीबांचे विचार सर्वसामान्य माणसाला लेखरूपाने वाचण्यात स्वारस्य असेलच असे नाही; परंतु ते कादंबरीच्या रूपात मांडले तर अधिक वाचले जातील असेही ठाकूर यांना वाटते. या लेखनाला कादंबरी म्हणावे की नाही याबद्दल तेच साशंक आहेत. परंतु ही एक चरित्रकहाणी आहे असे म्हटल्यास हे चरित्र आहे की कादंबरी हा प्रश्न निकाली निघू शकेल. रवीन्द्र ठाकूर यांनी पाचसहा वर्षे झपाटलेपणाने जोतीबांच्या जीवनकार्याचा मागोवा घेऊन हे लेखन सिद्ध केले आहे, आणि आधुनिक जाणिवांच्या संक्रमणकाळात जोतीबांनी जी वैचारिक व सामाजिक क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न केला, त्या प्रयत्नाचा विस्तृत आलेख काढला आहे. आरंभीच जोतीबांच्या या चरितकहाणीत ज्यांचा थोडाफार सहभाग आहे अशा शंभरावर व्यक्तींची नावे व त्यांचे जोतीरावांशी असणारे संबंध स्पष्ट केले आहेत. जोतीरावांचे आप्तस्वकीय, राज्यकर्ते, ख्रिस्ती मिशनरी, सहकारी, मित्र, शेजारी, कार्यकर्ते, प्रमुख व्यक्ती, शासकीय अधिकारी, ग्रंथकार व पत्रकार यांची ही माहिती चरित कहाणीच्या विविध प्रसंगांच्या नाट्यपूर्ण चित्रणाला सोयीची ठरते. एकूण एकशे एक



दृश्यांमध्ये (प्रकरणांमध्ये) ही चरितकहाणी विभागली आहे. शालेय जीवनातच टॉमस पेनची पुस्तके वाचून आंधळा देशाभिमान आणि मतलबी धर्मश्रद्धा यांची झालेली जाणीव आणि गुलामगिरी व समाजातील विषमता याबद्दल निर्माण झालेली चीड पहिल्या प्रकरणात स्पष्ट केली आहे.

बंडवाल्यांना इंग्रजांशी लढाई करून पेशवाई परत आणायची आहे. पण ते आपले ध्येय असू शकत नाही; तसे करणे वेडेपणाचे आहे आणि त्यात समाजाचे कल्याण नाही; पेशवाई म्हणजे भटशाही आहे आणि पेशवाई पुन्हा आली तर शूद्रातिशूद्रांना न्याय मिळणार नाही असे आपले मत बनल्याचे जोतिबा सांगतात.

ब्राम्हणशाहीच्या जाचामुळे गोरगरीबांना अगणित दु:खे भोगावी लागत आहेत; भटशाहीच्या शोषक विळख्यातून समाजाला सोडवणं हे आपलं पहिलं कर्तव्य आहे आणि त्यासाठी परिस्थिती अनुकूल आहे असे जोतीबांना त्यावेळी वाटत होते. त्याचबरोबर मानवता हाच खरा धर्म आहे ! धर्म ही खाजगी बाब मानली तर धर्मांतर करून काहीच साधत नाही. कुठलाही धर्म मूळ शुद्ध स्वरूपात उरलेला नाही. प्रत्येक धर्मात दोष शिरलेले आहेत. कुठल्याही धर्माला आज अद्वितीय असे महत्त्व उरलेले नाही'' अशी धार्मिक विचारसरणीही त्यांना स्वीकारार्ह वाटू लागली होती. एकेकाळी मात्र त्यांना ख्रिस्ती धर्माचे आकर्षण वाटलेले होते. मिशनशाळेत फादर मरे मिचेल यांनी तसा आग्रहही चालवला होता. ''तू ख्रिस्ताचा स्वीकार कर. त्याशिवाय तुला खऱ्या धर्माचा प्रकाश दिसणार नाही'' असे फादरचे म्हणणे होते. त्यावर जोतीबांची प्रतिक्रिया त्यांच्या स्वतंत्र विचारशक्तीची चुणूक दाखवणारी होती. ''ख्रिस्ताची शिकवण अंगी बाणवायची तर त्यासाठी ख्रिस्तीधर्म स्वीकारायलाच हवा का ? आणि स्वत: येशू हाच जर देव व माणूस यांच्यातला मध्यस्थ असेल तर त्याचं शिष्यत्व स्वीकारून काय फायदा होतो? ख्रिस्ती धर्मातील 'ओरिजिनल सिन'ची, मानवाच्या प्रारंभिक पापाची कल्पनाही भारतीय मानसिकतेला आपलीशी वाटणे अवघड जाते.

- आरंभीच्या काही प्रकरणातून जोतीबांच्या विविध विषयांवरील चिंतनाची अशी झलक दाखवली गेली आहे.

पुढे जोतीबा प्रत्यक्ष कार्यामध्ये उतरतात. स्वत:च्या पत्नीलाच शिक्षण देऊन घरापासून सुरुवात करतात. बुधवार पेठेत भिडे वाड्यात मुलींसाठी शाळा ही काढतात. पुणेकर ब्राम्हण त्या शाळेविरुद्ध मोहिम उघडतात. पण सावित्री-जोती त्याने डगमगत नाहीत. उलट आपल्या जीवितकार्याची दिशा गवसते. अर्थात त्यासाठी घरच्यांचा रागही सहन करावा लागतो आणि ब्राम्हणवर्गाच्या विरोधालाही तोंड द्यावे लागते. सावित्रीचे सासर तुटते. माहेरही तुटल्यासारखे होते. पण प्राचार्य मेजर कँडी जोतीरावांच्या स्त्री शिक्षणकार्याबद्दल गौरव करण्याचा प्रस्ताव आणतात. १६ नोव्हेंबर १८८२ रोजी सत्कार होतो. त्यांच्या शाळांना देशीपरदेशी अधिकारी व्यक्ती भेटी देऊ लागतात. ब्राम्हणशाहीचा बुरखा फाडण्यासाठी जोतीबा तृतीय रत्न हे नाटक लिहून त्याचे जाहीर वाचन करतात. विदूषकाद्वारे जोशीबुवांच्या



लबाड्यांची खिल्ली उडवतात.

जोतीबांवर जे मारेकरी घातले जातात ते मारेकरी त्यांची हत्या करण्याऐवजी त्यांचे भक्त बनून जातात. घरच्या माणसांना मात्र जोतीबांच्या कार्याचे मोल उमगतच नाही.

अठराशे सत्तावन्नचा भारतीय सैनिकांचा उठाव ब्रिटिश सत्तेला हादरा देऊन जातो.

आपल्या घरी अनाथ बालकांसाठी अनाथालय उभारण्याची कल्पना जोतीराव प्रत्यक्षात आणतात. अज्ञानाने वाकडे पाऊल पडून गरोदर राहिलेल्या विधवांनी या आश्रमात येऊन बाळंत व्हावे, हवे असल्यास मूल घेऊन जावे किंवा आश्रमात सांभाळण्यासाठी द्यावे अशी पत्रके त्यांनी पुण्यात वाटली. त्यावर गरमागरम चर्चा झाली. परंतु अडलेल्या बाया येत राहिल्या आणि जोतीरावांच्या या उपक्रमाचीही सामाजिक उपयुक्तता लोकांना पटू लागली. अनेक हितचिंतकांनी मदतीचा हात दिला. विधवांचे हाल व समाजातील उपेक्षित स्थान पाहून पुनर्विवाहाची प्रथा सर्वमान्य व्हावी म्हणूनही त्यांनी प्रयत्न सुरू केले.

जोतीबांना स्वत:चे मूलबाळ नव्हते. म्हणून घरचे लोक दुसरे लग्न करावे असा त्यांना आग्रह करू लागले. जोतीबांनी आपल्या थोरल्या भावाला सुनावले, ''आम्हांला मूल नाही याचा दोष सावित्रीवर ढकलणे बरोबर नाही. पहिली स्त्री असताना, तिला मूल होत नाही म्हणून दुसरं लग्न करणं हीनपणाचं व माणुसकीला न शोभणारं कृत्य आहे. स्त्री दुसऱ्या लग्नाचा विचारही करू शकत नाही.'' आणि त्यांनी त्या सूचनेला धुडकावून लावले.

पोटापाण्याचा उद्योग म्हणून जोतीबा बांधकामाची कंत्राटे घेऊ लागले. बांधकाम साहित्याची विक्री करू लागले. कात्रजच्या बोगद्यासाठी दगड पुरवण्याचे पोटकंत्राटही जोतीबांना मिळाले.

१८७३ साली जोतीबांचा गुलामगिरी हा ग्रंथ प्रसिद्ध झाला, त्यात ब्राम्हणी धर्मग्रंथांमधील बाजारगप्पांवर जोरदार हल्ला चढवला होता. त्याच वर्षी सत्यशोधक समाजाची स्थापना करण्यात आली. ''सर्व मानवप्राणी एकाच देवाची लेकरं आहेत, सबब ती माझी भावंडं आहेत. परमेश्वराची पूजा अगर भक्ती करतेवेळी मी मध्यस्थाची गरज ठेवणार नाही. मी माझ्या मुलामुलींना सुशिक्षित करीन. नेहमी राजनिष्ठेनं वागेन. सत्यरूप परमेश्वरास साक्षी ठेवून मी ही प्रतिज्ञा करीत आहे.'' अशी प्रतिज्ञा त्यावेळी उपस्थितांनी घेऊन या सत्यशोधक समाजाचे सदस्यत्व स्वीकारले. सत्यशोधक पद्धतीने साधेपणाने लग्नविधी सुरू केला. भटजीशिवाय.

काशीबाई या विधवेच्या नवजात अर्भकाला दत्तक घेऊन फुले दांपत्याने त्याचे नाव यशवंत असे ठेवले. 'येशू' हे नाव त्यावेळी त्यांच्या मनात होते. वैऱ्यावरही प्रेम करा असा सद्बोध देणाऱ्या महासत्पुरुषाचे स्मरण त्याद्वारे होत राहावे ही त्यांच्या मनीची भावना.

स्वामी दयानंदांच्या पुणे भेटीच्या वेळी पुणेकर ब्रम्हवृंदाने स्वामी गर्दभानंदाची मिरवणूक काढून धमाल उडवून दिली. त्या मिरवणुकीत माळी कुणबी तरुण मुले सामील झाली याचे जोतीरावांना दु:ख झाले. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी निबंधमालेच्या एका अंकात सत्यशोधक समाजावर आणि जोतीरावांच्या पुस्तकांवर घणाघाती हल्ला चढवला. पण त्या

टीकेला खरमरीत उत्तर देण्याची कल्पना जोतीबांनी स्वीकारली नाही. तेव्हा कृष्णराव भालेकर यांनी मात्र सणसणीत उत्तर दीनबंधू या पत्रात दिले. जोतीबा विविध प्रासंगिक विषयांवर लेखन करीत राहिले. त्यासाठी दीनबंधूचा उपयोग त्यांना होऊ लागला.

नगरपालिकेचे सदस्य म्हणूनही जोतीबांनी काही काळ काम केले. पुणे शहरात नवीन दारूचे गुत्ते निघू नयेत यासाठी त्यांनी प्रयत्न केले. वेताळपेठेतील नव्या भाजी मंडईच्या इमारतीलाही त्यांनी विरोध केला. कारण त्या इमारतीमुळे गरीब भाजी विक्रेत्यांची रोजीरोटी संपुष्टात आली असती.

या सर्व लेखनात विविध विषयांवरील मतप्रदर्शनाला व चर्चांना प्राधान्य आहे, परंतु काही प्रसंगात व्यक्तिविषयक संघर्ष ही नाट्यपूर्ण शैलीत रंगवण्यात आला आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या शेवटच्या आजारपणाच्या वेळची त्यांची संभ्रमावस्था उत्तम दाखवली आहे. (प्रकरण ७३) त्यांनी केलेली जहरी टीका विसरून जोतीबा त्यांच्या भेटीला गेले. त्यांच्या अंत्ययात्रेतही सामील झाले.

पंडिता रमाबाईही एव-दोनदा फुलेवाड्यात येऊन गेल्या. जोतीबांचे मत असे की स्त्री सुधारणांबद्दल बोलणाऱ्या रमाबाई पुराणे सांगतात. याचा अर्थ त्यांचा हिंदूंच्या जुनाट पोथ्यांचा अभ्यास अपुरा आहे. (पृष्ठ ३१३) पंडिता रमाबाईंनी पुढे लंडन मुक्कामी ख्रिस्ती धर्माचा बाप्तिस्मा घेतला तेव्हा जोतीबांना आपला कयास खरा ठरल्याचा आनंद झाला. (३४२)

मराठी ग्रंथकारांच्या दुसऱ्या सभेला पाठवलेल्या पत्रात जोतीरावांनी सर्व मनुष्यांच्या मानवी हक्कांविषयींचा विचार मांडून, त्याला विरोध करणाऱ्या लोकांच्या सभेशी व पुस्तकांशी आपला मेळ बसत नाही असा स्पष्ट अभिप्राय कळवला. (३५७)

इंग्लंडचे राजपुत्र ड्युक ऑफ कॅनॉट यांच्या पुणेभेटीच्या वेळी मुंडासे-घोंगडी, आखूड कुडता व गुडघ्यापर्यंतची धोती अशा वेशात उपस्थित राहून फुले यांनी शेतकऱ्यांची बाजू मांडणारे भाषण केले. हा एक विलक्षण प्रकार होता. (प्रकरण ९०)

शेवटच्या दिवसांचे वर्णनही हेलावणारे आहे.

या चरित्र कहाणीमधून जोतीरावांचे महात्म्य व व्यक्तित्व वाचाकंना सुसूत्रपणे व सहजपणे उमगू शकेल.

**पृष्ठे ४५६, तीनशे रुपये सवलतीत रु.२५५, सभासदांना रु.२२५,पोस्टेज रु.२०.**



## *मद्य नव्हे, हे मंतरलेले पाणी*


**संपादक - अरुण शेवते**

**काठोकाठ भरू द्या प्याला, फेस भराभर उसळू द्या**

''सुंदर तरुणीचं चुंबन आणि उंची मद्याचा आस्वाद जितक्या लौकर घेता येईल तितक्या लौकर घ्या. नाहीतर दोन्हींची चव निघून जाते.'' हा सल्ला दिला आहे नोबेल पुरस्कार विजेत्या अर्नेस्ट हेमिंग्वे याने.

आपल्याकडे यातील पहिली गोष्ट चारचौघात करणे अजूनही अवघड आहे. परंतु हेमिंग्वेने दिलेल्या सल्ल्यातील दुसरी गोष्ट करणे त्यामानाने सोपे आहे. जवळ मालमसाला आणि रसिक दिलदार मित्रांचा गोतावळा असला की हा सल्ला अधिकच प्रभावशाली ठरू शकतो. मैफलीला खरा रंग देऊ शकतो.

'मद्य नव्हे, हे मंतरलेले पाणी' हे अरुण शेवते यांनी संपादित केलेले पुस्तक काही मराठी वाचकांच्या भुवयांना आणि कपाळावरील आठ्यांना व्यायाम देणारे ठरेल; परंतु जीवनातील विविध सुखांना चोखंदळपणे सामोरे जाणाऱ्या रसिकांचा आणि मद्यप्राशनाचा सराव असणाऱ्या व्यक्तींचाही आनंद वाढवणारे ठरेल. या पुस्तकात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, डॉ. मे. पुं. रेगे, मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष, द्वा. भ. कर्णिक, कथाकार शांताराम (के. ज. पुरोहित), बाळ सामंत, फिरोझ रानडे, दिनकर रायकर, सतीश काळसेकर वगैरे सद्गृहस्थांनी मद्यपानाच्या संदर्भातली आपापली अनुभवजन्य निरीक्षणे नोंदवली आहेत. त्याच बरोबर रेखा सबनीस यांनीही मद्यपानावरील आपल्या श्रद्धेचे बिनधास्त ऐलान केले आहे; आणि त्याचे श्रेय आपल्या आजोबांना दिले आहे. व्हिस्कीचा एक पेग त्यांचे आजोबा नियमित घेत आणि त्यात आजीलाही सामील करून घेत. ते आजीला म्हणत, '' हे बघ, नातवाच्या हातून श्राद्ध वगैरे करून तरी काय साधणार होतं ? त्यामुळं स्वर्गात गेलो असतो, एवढंच ना? आणि स्वर्गात कशासाठी जायचं? तर अप्सरांच्या सहवासात सुरापानाचा आनंद लुटण्यासाठी. हो की नाही?



मग तो आनंद मी या पृथ्वीवरच लुटतोय आणि तो देखील तुझ्या सहवासात. अप्सरांच्या नाही. आता यापेक्षा अधिक चांगला योग स्वर्गात देखील शक्य आहे का ?''

''सज्जड पिऊ शकणारी बाई म्हणून आपली उगीचच कुप्रसिद्धी झालीय,'' असं रेखाताई म्हणतात. ''ए, रेखाची बरोबरी करू नकोस हं. ती जाईल स्वत: ड्राइव्ह करत; तू मात्र टेबलाखाली झोपलेला असशील,'' असा इशारा पार्टीत अनेकदा दिला जायचा. पिण्यात अनेक उस्तादांना रेखाताईंनी हरवलेले असणार; म्हणून तर अशा दंतकथांचा सर्वदूर संचार झाला असणार. नाटकात काम करणाऱ्या नटनटींच्या दृष्टीने नाटकाचा हा चौथा अंक 'रम'ल्याशिवाय नाट्यप्रयोगाची खऱ्या अर्थाने फलप्राप्ती होत नाही. घोटाघोटाबरोबर सगळे ताणतणाव गळून पडतात. माणसं सैलढैल होतात; पोटातली मळमळ बाहेर फेकतात आणि मैत्रीला नवे रंग देतात. शिवाय डॉक्टरही आता सांगतात - रोज एकदोन पेग घेतल्याने हार्ट ॲटॅक येत नाही आणि ब्लडप्रेशरही काबूत राहतं.

रेखाताईंनीच असा बिनतोड युक्तिवाद सादर केल्यावर इतर नरवरांचे बोलणे काय मनावर घ्यायचे ? पण त्यांनीही आपापल्या परीने सुरावर सूर आळवले आहेत.

लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणजे भारतीय संस्कृतीचे अष्टपैलू अभ्यासक. त्यांनी वेद, शतपथ ब्राम्हण, तैतिरीय ब्राम्हण, उपनिषदे, गृह्यसूत्रे, गौतम धर्मसूत्र, मनुस्मृती, विष्णू धर्मसूत्र यातील संदर्भ देऊन मद्यविषयक त्या त्या वेळच्या आचार संहितेची वैशिष्ट्ये प्रकट केली आहेत. रामायण, महाभारत, कालिदासाचे रघुवंश, कौटिल्याचे अर्थशास्त्र या सर्वांचे हवाले दिले आहेत. चरक संहितेत मद्य हे अन्नासारखे आहे; योग्य रीतीने घेतल्यास ते अमृत असते; चुकीच्या पद्धतीने घेतले तर रोगकारक ठरते असे स्पष्ट सांगितले आहे.

किंतु मद्यं स्वभावेन यथैवान्नं तथा स्मृतम् ।
अयुक्तियुक्तं रोगाय युक्तियुक्तं यथा अमृतम् ।।

पण एकूण भारतातील सर्वच धर्म मद्यपानाला निषिद्ध मानतात, असे दिसते. ब्राम्हणांव्यतिरिक्त इतर वर्णांना मद्यनिवृत्तीची सक्ती नाही. सध्या मात्र भारतीय संस्कृतीला या मद्यपान निषेधाच्या जोखडातून प्रागतिक ब्रम्हजनांनी मुक्त करून, आपला अद्ययावतपणा सिद्ध केला आहे.

प्राचार्य मे. पुं. रेगे यांना विश्वकोशाचे संपादन करण्याच्या निमित्ताने की काय, स्वत:च्या मद्यप्रेमापेक्षा अथेन्स (ख्रिस्तपूर्व चौथे शतक); व्हर्जिनिया (१८ वे शतक), येथील सॉक्रेटिस व जेफर्सन प्रभृतींचे किस्से सांगण्यात विशेष रस दिसतो. १९२१ ते २४ या काळात ते ऑक्सफर्डला होते. तेथील काही गमतीजमती त्यांनी दिल्या आहेत.'' आम्ही मित्र आठवड्यातून तीनचारदा तरी दारू पिऊन चांगले झिंगत असू... कुणाला तरी आमचे कपडे उतरवून आम्हांला बिछान्यावर झोपवावे लागत असे... यौवनमदामुळे आमचे वर्तन अधिक ढंगदार होत असे'', हे वाचून ऑक्सफर्डमधल्या ऑक्सबद्दलचा आदर वाढायला हरकत नाही.

प्रा. मंगेश विठ्ठल राजाध्यक्षांनी कविवर्य अनिल यांचे एक लक्षवेधक वचन उद्धृत



केले आहे,'' चांगला नवरा, चांगली दारू पिऊन चांगल्या बायकोला अधिक चांगले वागवतो.''

महाराष्ट्र टाइम्सचे आद्य संपादक द्वा. भ. कर्णिक यांनी नवमानवतावादाचे प्रवर्तक डॉ. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या रसिक मद्यप्राशनाच्या मैफलींची स्मृती जागवली आहे. पंडित नेहरू त्यांच्या तब्येतीची चौकशी करण्यासाठी देहरादूनला आले. तेव्हा त्यांनी पंडितजींना एकशेसाठ वर्षांपूर्वीची ऱ्हाइन वाइन ऑफर केली. तर युगोस्लाव्ह राष्ट्राध्यक्ष मार्शल टिटो यांनी एलन रॉयसाठी युगोस्लाव्ह मद्याची बाटली आपली होती. सकाळचे संस्थापक डॉ. नानासाहेब परुळेकर हे कर्णिकांचा 'पत्रकारातील एकमेव स्कॉचमन' असा उल्लेख करीत; कारण कर्णिक स्कॉच व्हिस्की हा आपला ब्रँड कधी बदलत नसत.

मद्यपान या विषयातले आपण हौशी कलावंत आहोत, मुरब्बी जाणकार नाही असे प्रारंभीच स्पष्ट करून कथाकार शांताराम यांनी आपण पाळत असलेली पथ्ये सांगितली आहेत. ''मी कधीही एकट्यानं मद्यपान करीत नाही... फुकटात प्यायला मिळतं, मनसोक्त पिऊन घ्या या पंथात आपण बसत नाही; मद्यपानानंतर ड्रायव्हिंग करीत घरी पोचता येईल इतपत तरी सावधगिरी बाळगली पाहिजे.''

बाळ सामंतांचा हिशेबीपणा मद्याबाबतही दिसतो. दिल्लीच्या एकूण पाचशे फेऱ्यात त्यांनी अनेक मंत्री, खासदार, आय ए एस अधिकारी यांच्याशी मैफली जमवल्या. त्यावेळी परदेशी दूतावासात शिवास रिगलची बाटली ७५ रुपयांना मिळे. दर फेरीत चारपाच बाटल्या सामंत बरोबर घेऊन येत. आजही ते फक्त परदेशी मद्यच घेतात. स्कॉच व्हिस्कीमध्ये त्यांना सिंगल माल्ट असणाऱ्या व्हिस्की विशेष प्रिय आहेत. जॉनी वॉकर ब्लॅक लेबल, ग्लेन फिडिश, रॉयल सॅल्यूट, ब्ल्यू लेबल, ग्रीन लेबल अशा विविध रंगांची उधळण त्यांना आवडते.

लोकसत्तेचे दिनकर रायकर यांनी पत्रकार म्हणून हजेरी लावलेल्या अनेक स्पिरिच्युअल पार्ट्यांची नोंद केली आहे. माटुंग्यातील गुन्हेगारदादा वरदराजन याच्याकडे एकदा रायकरांना मोहन रावले (शिवसेनेचे खासदार) यांनी नेले. वरदा स्वत: पीत नसे; पण पत्रकारांना भरपूर पाजत असे. तुम्ही पत्रकार मला समजून घेत नाही अशी त्याची तक्रार.

- अशा अनेक गमती-जमतींचा ऐवज या लेखांमध्ये विखुरलेला आहे.

हम तो समझे थे की बरसात में बरसेगी शराब
आई बरसात, तो बरसात ने दिल तोड दिया

हे बेगम अख्तरचे बोल. कुसुमाग्रज मद्यपानाला ग्रंथवाचन म्हणत, काळसेकर गंगापूजन म्हणतात. कुणी स्पिरिच्युअल पार्टी. मद्यपानाने कोणाचे विमान हवेत उडते, कोणाचे स्वत:वरचे नियंत्रण जाते. असे वेगवेगळे नमुने दाखवण्याची ताकद या मंतरलेल्या पाण्यात आहे. ज्यांना झेपेल त्यांच्यासाठी ते मुबलक आहे. मयखान्याचे शंभर दरवाजे सतत खुलेच असतात.


**पृष्ठे १७२ एकशेवीस रुपये सवलतीत रु.१०२,**
**सभासदांना रु.९०,पोस्टेज रु.१५.**

# दिवस फार चांगले आहेत

**लेखक - विद्याधर पुंडलीक**

## साम्यवादी चळवळीतील अंतर्विरोधाचे भेदक नाट्य

विद्याधर पुंडलीक यांचा कथालेखनाप्रमाणेच नाट्यलेखनाकडेही ओढा होता. 'माता द्रौपदी' या नाटकाचे काही प्रयोगही झाले. एखादा विशिष्ट विचार वा दृष्टिकोन मांडण्यासाठी नाट्यमाध्यम त्यांना हाताळावेसे वाटे. कम्युनिस्ट वगैरे राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांमधील सुप्त संघर्षाबद्दल त्यांना कुतूहल होते. त्या पक्षात होणारी फाटाफूट ही तात्त्विक भूमिकेतील मतभेदांमुळे कितपत असे आणि वैयक्तिक सत्तास्पर्धेमुळे कितपत असे असाही प्रश्न त्यांना पडत असे. पुणे-मुंबईतील साम्यवादी, समाजवादी विचारसरणीच्या नेत्यांमधील वेगवेगळे गट, जवळच्या व्यक्तींमध्ये येणारा पराकोटीचा दुरावा पाहून त्यांच्या संवेदनाशील मनाला चटका बसे. काल एका व्यासपीठावरून बोलणाऱ्या व्यक्ती आज एकमेकांशी लढताहेत हे दृश्य त्यांना चमत्कारिक व अनाकलनीय वाटे. एकाद्या विशिष्ट प्रश्नावर अटीतटीची भूमिका घेतल्याबद्दल किंवा आपली प्रामाणिक भावना व्यक्त केल्याबद्दल काही कार्यकर्त्यांना पॉलिटब्यूरोमध्ये धारेवर धरले जाई, पक्षांतर्गत विरोधक म्हणून एकाकी पाडले जाई, प्रसंगी पक्षातून शिस्तभंगाबद्दल काढूनही टाकण्यात येई. कधीकधी त्याला जीवनातून उठवण्याचा प्रयत्नही होई. कारण कम्युनिस्ट चळवळीने हिंसा कधीच वर्ज्य मानलेली नाही.



'दिवस फार चांगले आहेत' या नाटकात सतीशदा चौधरी या ज्येष्ठ कम्युनिस्ट नेत्याने निवडणुका लढवून बहुमत संपादन करून सत्ता मिळवण्याचा मार्ग चोखाळल्याबद्दल त्याचेच सहकारी त्याला प्रतिगामी, प्रतिक्रांतिवादी, अशास्त्रीय रोमँटिक इझमवाला ठरवून त्याच्यापुढे तीन पर्याय ठेवतात. एक, आपण आतापर्यंत जे काही केले ते चुकीचे होते असा पश्चात्तापदग्ध कबुलीजबाब देणे, राजीनामा देऊन, का सरकारी शेतावर बोटॅनिस्ट म्हणून काम करणे किंवा मृत्यूला सामोरे जाणे....



आणि त्याला गोळ्या मारण्यासाठी त्याच्यावर पिस्तूल उगारते ती त्याचीच दीर्घकालीन प्रेयसी, त्याचीच शिष्या व सेक्रेटरी असणारी ज्योती. तिच्या पिस्तूल उगारलेल्या मूर्तीकडे पाहत सतीशदा क्रांतीच्या अटळ शोकांतिकेच्या प्रक्रियेबद्दल भाष्य करताना म्हणतो, ''कॉम्रेडस, आपल्यापैकी प्रत्येक जण तेच एक नाटक चालवीत आहे. क्रांती पुढे नेण्याऐवजी तेच एक नायक करीत आहेत. तीच रंगभूमी, तेच नेपथ्य, तोच अंधार, तोच प्रकाश. एका उंच क्षणावर राहू न शकणारे - माणुसकी मिळालेल्या क्षणीच जनावरं होणारे तेच तेच नट - त्यांच्याकडून तोच तोच अभिनय करून घेणारा तोच दिग्दर्शक ....काळ....अनंत काळ....सनातन काळ....सनातनत्वाचा कसला भीषण शाप हा अन् तरीही, कॉम्रेडस् हे सर्व अटळ आहे. तिथं तारुण्य आहे, तिथं क्रांतीचं, रचनेचं नाटक, नव्या मानवाचं नव्या समाजाचं स्वप्न आहे. आणि बदलाचे हे स्वप्न, आस जेवढी अटळ, तेवढीच आपल्या सर्वांची कुरूपताही अटळ !....ज्योती - माझी एकच चूक झाली, असं कुरूप होण्याचं मी नाकारलं... तुझं प्रेम घेऊन हे हौतात्म्य पत्करता आलं असतं तर फार बरं झालं असतं. पण शेवटी सगळंच समूळ जळतं. स्वप्न, ध्येय, निष्पापपणा, प्रेम....सगळंच समूळ.''

पहिल्याच प्रवेशात पार्टी फुटल्याची आणि पार्टीतून हिरेनचा गट बाहेर पडल्याची बातमी कळते. सतीशने पक्षाच्या बैठकीत स्वतःचा थीसिस मांडलेला असतो; निवडणूक प्रक्रियेत सहभागी होऊन, सत्ता संपादन करून आपला कार्यक्रम प्रत्यक्षात आणण्याची वेळ आली आहे असे त्याचे मत असते. ते मत पक्षाच्या पातळीवर मान्य होते; त्यामुळे हिरेनचा गट पक्षातून बाहेर पडतो. ''भांडवलशाही, पैसा, लाचलुचपत, भ्रष्टाचार या सर्वांनी पोखरलेली मतपेटी हे साम्यवादी क्रांतीचे प्रतीक होऊच शकत नाही. जो पक्ष भांडवलशाही दलालांच्या विधिमंडळाच्या चौकटीबाहेर राहून श्रमजीवी वर्गाचे लढाऊ नेतृत्व करील तोच खरा क्रांतिकारक '' असे हिरेनचे म्हणणे असते. त्यासाठी हिरेन आदिवासी भागात लोकांना सशस्त्र उठावाला तयार करण्याचा मार्ग चोखाळतो. पिस्तुलं, धनुष्यबाण, भाले जमवून जमीनदारांना ठार करा. सगळीकडे विखुरलेले लढे देण्यापेक्षा एका प्रदेशातील एक लहान पण भक्कम तळ उभारणे महत्त्वाचे आहे असे तो आपल्या अनुयायांना सांगतो.

ज्योतीला तरुण हिरेनचा तडफदारपणा आकृष्ट करतो. हिरेन तिला सांगतो, ''तू सतीशदाकडेच तुझे काम करीत राहा. तू आम्हांला हवी आहेस ती तेथे आमची हेर म्हणून. तेथील प्रत्येक गोष्ट, तेथे येणारे लोक, सीक्रेट मीटिंग्ज, रिपोर्टस, बारीक-सारीक हालचालीही आम्हांला कळवायला हवीस.'' हिरेनची खेळी उलटवण्यासाठी सतीश त्याच्या तळघरातील गुप्त जागी जातो.

हिरेन त्याच्यावर पिस्तूल उगारतो. पण सतीशच त्याला ठार मारतो. स्वतःला वाचवतो.

ज्योतीचे सतीशवर प्रेम आहे; परंतु हे वैयक्तिक पातळीवरचे प्रेम आणि पक्षकार्य यात गल्लत करता कामा नये हे देखील कम्युनिस्ट कार्यप्रणालीचे एक सूत्र असते. त्यामुळे लोकशाही व मतपेटी यांना मान्यता देणारा नेता म्हणून सतीशपासून ती पक्षीय पातळीवर

दूर जाते; आणि बंदुकीच्या नळीतूनच सत्ता जन्म घेते आणि वाढते यावर श्रद्धा ठेवणाऱ्या हिरेनचा पाठपुरावा करते. क्रांतीसाठी हेरगिरी करणे यात तिला आपण काही गैर करतो असे वाटत नाही; आणि त्याच भूमिकेतून ती सतीशवर गोळ्या झाडतानाही डगमगत नाही. क्रांतीऐवजी मतपेटीवर विश्वास ठेवणारा सतीशदा तिला पक्षद्रोही वाटतो. सतीशबरोबर काम करणारे भूपेश वगैरे कार्यकर्तेही सतीशच्या विरोधात जातात; आणि त्याचा बळी घेतात.

एकूणच हे नाटक दोन परस्पर विरुद्ध भूमिकांतील संघर्ष रंगवते; आणि कम्युनिस्टांच्या कार्यप्रणालीवर प्रकाश टाकते. पक्षातील प्रत्येक कार्यकर्ता हा एक दुसऱ्यांकडे संशयाने पाहतो, भावी गद्दार म्हणून पाहतो आणि प्रत्येकावर पाळत ठेवत असतो; तसेच विशिष्ट परिभाषा व कार्यप्रणाली यांचा ढालीसारखा वापर करून प्रतिस्पर्ध्यांना नामोहरम करण्यातही तरबेज असतो. असे पुंडलीक दाखवतात. सतीश, हिरेन, भूपेश, ज्योती या सर्वांच्या व्यक्तिरेखा ते काळजीपूर्वक रंगवतात. मुळात कम्युनिस्ट पक्षाकडे ते कसे वळतात या बद्दलच्या भावनात्मक पार्श्वभूमीचाही निर्देश करतात. सहजपणे पिस्तूल काढून समोरच्या माणसाला ठार मारण्याइतका कठोर निर्दयपणाही दाखवतात; आणि मतपेटीद्वारे सत्तासंपादनाची सतीशदाची नवी चाल म्हणजे त्याचा भित्रेपणा आहे असा आरोपही करायला त्याच्या सहकाऱ्यांना भाग पाडतात....

पुंडलीकांच्या या नाटकामुळे साम्यवादी चळवळीतील अंतर्विरोधाचे एक अंतर्भेदक दर्शन घडते.

**पृष्ठे ६४ चाळीस रुपये सवलतीत रु.३४, सभासदांना रु.३०,पोस्टेज रु.१५.**

## मन:पूर्वक आभार !

**आपण आठवणीनं पाठविलेल्या दीपावली शुभेच्छा मिळाल्या. धन्यवाद.**

इलेक्ट्रोलेड (पुणे), प्रायव्हेट लिमिटेड. (पुणे), अजब स्टोअर्स. (निपाणी), संजयसिंह रामराम चव्हाण, जी. एम. मेहता, (डोंबिवली), जवाहर क्लॉथ स्टोअर्स (मुरगुड), संतसंग परिवार (पुणे), श्रीराम वाचनालय (जालना), मा. शं. खळदकर (पुणे), प्रा. ईश्वरदास मालवीय (मोर्शी, अमरावती), दि फेडरेशन ऑफ एज्युकेशन पब्लिशर्स इन इंडिया. (न्यू दिल्ली), आय बी एम आर. (पुणे), साकेत प्रकाशन (औरंगाबाद), फ्रँक ब्रदर्स अँड को. (पब्लिशर्स) लि. (न्यू दिल्ली), मॅट्रिक्स बिझिनेस मशीन्स् लि. (पुणे), इरेश स्वामी. (सोलापूर), हॉटेल श्रेयस. (पुणे), पराग प्रकाशन. (मुंबई), कॉन्टिनेन्टल प्रकाशन. (पुणे), पुष्प प्रकाशन. (पुणे), प्रशांत हेमके, (वर्धा), द. ता. भोसले. (पंढरपूर).




# पर्यावरणसंतुलनासाठी हिरवं सोनं

**डॉ. सरिता पटवर्धन**

## भारतीय वनस्पती म्हणजे हिरव्या सोन्याच्या खाणी

पुण्याच्या राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेतील ख्यातिप्राप्त शास्त्रज्ञ डॉ. सरिता पटवर्धन यांनी कार्बनी रसायनांच्या विविध रूपांबद्दल संशोधन करून डॉक्टरेट मिळवली होती. त्याबद्दल सृष्टिज्ञान मासिकात काही लेखही लिहिलेले होते. दुर्दैवाने कर्करोगाने त्यांचे अकाली निधन झाले. सोन्याचे बदलते रंगरूप, रासायनिक उद्योगांत वनस्पती, वनौषधी, वनस्पतिज कीटकनाशके, सुगंध आणि स्वाद, वानस उर्जा अशा सहा लेखांचा हा संग्रह त्यांच्या निधनानंतर प्रसिद्ध झाला आहे.

सोन्याचे बदलते रंगरूप या लेखात वृक्षवेलींना हिरवे सोने म्हटले असून, या हिरव्या सोन्याच्या खाणीतून विविध मौल्यवान चिजा हस्तगत करण्यासाठी जगभर शास्त्रज्ञांचे प्रयोग चालू आहेत याकडे लक्ष वेधले आहे.




जैवक्रियाशील (बायोॲक्टिव्ह) पदार्थ (औषधे, कीटक-नाशके), अतिसंवर्धन (टिश्यू कल्चर), जनुक अभियांत्रिकी (जेनेटिक इंजिनिअरिंग) वगैरे गोष्टींना आता महत्त्व प्राप्त होत आहे. ऊस, एरंड, ओपियम अल्कलॉइड्स, सिंकोना, व्हिंका, सर्पगंधा, आयपेकॉक, स्टिरॉइडस, सेन्नोसाइडस, इसबगोल, मेन्थाल (पुदिना), सिंबोपोगॉन, चंदन, निलगिरी, सुगंधी तेलांसाठी उपयुक्त वनस्पती यापुढे चांगली कमाई करून देणाऱ्या ठरतील.

झाडातील प्रत्येक पेशी म्हणजे रात्रंदिवस चालणारा अतिविकसित रासायनिक कारखानाच होय. माती, पाणी, हवा व सूर्यप्रकाश या सहज उपलब्ध पदार्थांपासून आणि ऊर्जेपासून असंख्य प्रकारच्या रसायनांची निर्मिती करण्यात पेशी गढलेल्या असतात. वनस्पतींच्या चयापचय प्रक्रियेत मेदाम्ले, तेले,

कर्बोदके वगैरे प्राथमिक पदार्थ तयार होतात; त्या प्राथमिक पदार्थांपासून जैवसंश्र्लेषण पद्धतीने दुय्यम पदार्थ तयार केले जातात. (उदा. औषधी द्रव्ये, कीडनाशके, डिंक, राळ, रंग, रबर, सुंगधी द्रव्ये इ. )

आयुर्वेदात वर्णन केलेल्या अनेक औषधी वनस्पतींचाही आता बारकाईने शोध घेतला जात आहे. त्यांचे औषधी गुणधर्म पडताळून घेतले जात आहेत.

अपामार्ग - मूत्रवर्धक
वेखंड - प्रशामक
अडुळसा - श्वासनलिका रुंदीकरण
भुईनिंब - यकृताचे टॉनिक
ब्राम्ही - स्मरणशक्तीवर्धक
पळस - कृमिनाशक
हिरडा - सूज व लालीरोधक
पुनर्नवा - मूत्रवर्धक
बकुळी - मूत्र रोग परिहारक
कूटज - अवरोधक
सलसिया - मधुमेह
विदरीकंद - शक्तिवर्धक, काामोत्तेजक, संतनिबंधक
सदाफुली - कर्करोग विरोधी द्रव्ये

वनौषधींचा वापर पूर्वी पाला वाटून किंवा मूळ, खोड उगाळून केला जाई. अर्क काढून, काढा करून त्यांचे सेवन केले जाई. आता वेगवेगळ्या तपमानात वनस्पतींचा अर्क काढून त्याचे शुद्धीकरण करण्याची नवनवी तंत्रे विकसित होत आहेत. त्यामुळे त्या अर्कांमधून औषधी द्रव्ये अलग करणे शक्य झाले आहे. त्या द्रव्यांच्या रेणूंची रचना आणि वर्णपट (स्पेक्ट्रम) शोधून नव्या रासायनिक संरचना केल्या जात आहेत. संश्र्लेषण पद्धतीने (ऑरगॅनिक सिंथेटिक मेथड) अनेक क्रियाशील वनस्पतीजन्य पदार्थ प्रयोगशाळेत तयार करता येऊ लागले आहेत. ही कृत्रिम औषधे अधिक परिणामकारक व स्वस्त राहतील अशी शक्यता आहे. कर्करोग, एडस, हिवताप यावर वापरता येणाऱ्या वनस्पतींची यादीच वनौषधी या प्रकरणात देण्यात आली आहे. कर्करोगावरील उपचारासाठी घाणेरी, बिब्बा, सदाफुली, कडूलिंब, अश्वगंधा, पुनर्नवा, पटवेल, मनजीत, कापूस, सोमलता, वरूण, मधुमालती, पापती, तेजमूळ, पुनीर, पिंडाझा, पाडळ वगैरे वनस्पतींच्या विशिष्ट द्रव्यांचा वापर होऊ शकेल. त्यावर संशोधन चालू आहे.

रोटिनोन, क्वासिन, पायरेथ्रम, निकोटीन या वनस्पतींचा वापर कीटकनाशक म्हणून दीर्घकाळ होत आला आहे. एक हजार वनस्पतींमध्ये कीटकनाशकाचे गुणधर्म आढळून आले आहेत. ३२० वनस्पती कीटकांना पळवून लावतात, ३० वनस्पती कीटकांना आकृष्ट करून पकडतात, सीताफळ, वेखंड, निरगुडी, उन्हळी (टफ्रोसिया)



यांचाही उपयोग कीटकनाशक म्हणून होऊ शकेल. तसे संशोधन चालू आहे. सीताफळाच्या बिया विषारी असून त्यांचा अर्क काढल्यास कीटकनाशक म्हणून तो उपयुक्त ठरेल. परंतु आजतरी हा अर्क काढण्याची सुलभ पद्धत अवगत नाही. सीताफळाच्या पानांचा उपयोग उवा, ढेकूर, गोचिड वगैरे मारण्यासाठी होतो.

भारतीय कडूलिंबाचा वापर कीटकनाशक म्हणून करण्याला आता जागतिक मान्यता मिळाली आहे. कडूलिंबापासून मार्गोसान-ओ हे नैसर्गिक कीटकनाशक बनवण्यात येते. पर्यावरण संरक्षण संस्थेनेही त्याचा पुरस्कार केला आहे. हे कीटकनाशक कमी विषारी आहे; त्याचे अवशेष जमिनीत टिकून राहात नाहीत. सध्या अजूक, शक्तिमान, अमृतगार्ड, नीकार्म, नीमाक्स डस्ट, नीम्बीटर ही कीटकनाशके बाजारात उपलब्ध आहेत.

कापूर, कस्तुरी, पेपरमिंट, ईथर, तिखट, कुजकट व पुष्पसदृश असे सात प्रकारचे वास असून सुगंध निर्मितीची परंपरा भारतात प्राचीन काळापासून चालू आहे. खोड, मूळ, फुले, साल, फळे, झाडाचा चीक अशा कुठल्हाही भागांपासून सुवासिक तेले निघतात. मूळ (वाळा), खोड (चंदन), साल (दालचिनी), फुले (चाफा, गुलाब), फळ (वेलदोडा), झाडाचा चीक (ऊद, धूप) इ. या वनस्पतींची निर्यातही मोठ्या प्रमाणावर होते.

जलद वाढणाऱ्या व इंधन म्हणून कामाला येणाऱ्या झाडांची लागवड ही सध्या ऊर्जा लागवड या नावाने ओळखली जाते. मोठ्या प्रमाणात जैवद्रव्याची उपलब्धता, उच्च उष्णता मूल्यांक, जलद वाढ कापणीनंतर जोमाने धुमारे फुटण्याची प्रवृत्ती, किमान देखरेख इत्यादी बाबींवर उर्जा लागवडीसाठी झाडांची निवड केली जाते. जैव द्रव्यापासून उत्पादक वायू निर्माण करून त्यापासून औष्णिक उर्जा व वीज तयार करता येईल.

अशी हिरव्या सोन्याची बहुमूल्य उपयुक्तता लक्षात आणून देणारे हे पुस्तक आहे. या वनस्पतींवर संशोधन करणाऱ्या तरुणांना स्वत:चे पेटंट मिळवून भरपूर कमाई करण्यास अवसर आहे. पारंपारिक समजुती, आयुर्वेदातील तपशील आणि आधुनिक दृष्टिकोन व संशोधन यांचा मेळ घालून काही रोगांवरील रामबाण औषधे घरच्या घरी तयार करता येतील. त्या दृष्टीने हे पुस्तक प्रेरणा देणारे आहे.

**पृष्ठे ९६ साठ रुपये सवलतीत रु.५१, सभासदांना रु.४५,पोस्टेज रु.१५.**

## चुकीची दुरुस्ती

ग्रंथजगतच्या दीपावली विशेषांकात 'इट इज ऑलवेज पॉसीबल' या किरण बेदी यांच्या पुस्तकाच्या अनुवादकर्त्या लीना सोहोनी यांचे नाव राहिले होते. तसेच 'सुंदरबनच्या जंगलात' या पुस्तकाच्या मूळ लेखकाचे नाव श्री. शिवशंकर मित्र यांच्या ऐवजी सुनील गंगोपाध्याय असे छापले गेले आहे. त्याबद्दल दिलगीर आहोत.

# द फोर्थ के

## अनु. वनिता सावंत


**अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाच्या**
**मुलीचे अपहरण होते, आणि -**

गॉडफादरचा लेखक म्हणून मारिओ पुझोचे नाव जगभर गाजले. त्याच्या कादंबऱ्यांवरील चित्रपटही तुफान चालले. याच वर्षी त्याचे देहावसान झाले. त्याची द फोर्थ के ही त्याची गाजलेली कादंबरी आत मराठीत आली आहे.

फोर्थ के म्हणजे चौथा केनेडी.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन एफ केनेडी यांचा १९६३ मध्ये खून झाला. त्यांचे रॉबर्ट केनेडी व एडवर्ड केनेडी हे दोघे बंधू. रॉबर्टचाही खून झाला. त्यांचा पुतण्या फ्रान्सिस - म्हणजे चौथा केनेडी. हा अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष झाला आहे अशी कल्पना करून मारिओ पुझोने लिहिलेल्या 'दि फोर्थ के' या कादंबरीचाही चित्रफलक खूप विस्तीर्ण आहे. अनेक देशांचा, अनेक दबाब गटांचा, मातबर व्यक्तींचा, दहशतवादी आणि माफिया टोळयांचा, शासकीय अधिकाऱ्यांचा या कथानकाशी संबंध आहे.

या राष्ट्राध्यक्षाची एकुलती एक मुलगी थेरेसा. तिचे आपल्या वडिलांशी फारसे पटत नाही. ती हट्टी असते. अमेरिकन पद्धतीनं ती स्त्रीवादी होती. समाजवादी विचारसरणीची पुरस्कर्ती होती. वडिलांवर तिचे प्रेम असलं तरी त्यांच्या अध्यक्षपदाचा तिला तिरस्कारा वाटे. ती वडिलांबरोबर व्हाइट हाऊसमध्ये राहात नसे. स्वतंत्र राही. कर्करोगाने आजारी असलेल्या आपल्या आईच्या मृत्यूच्या वेळी वडील सत्तासंघर्षात गुंतले होते, म्हणून तिच्या मनात नाराजी होती. अध्यक्षांची मुलगी म्हणून मिळणारी संरक्षणव्यवस्था तिला पसंत नव्हती. शिक्षणासाठी ती युरोपमध्ये आली होती. ईस्टर संडेला ती रोमहून न्यूयॉर्कला जाणार होती. वॉशिंग्टनला वडिलांबरोबर काही काळ राहण्याचे तिच्या मनात होते.






रोमहून तिचे जंबोजेट उड्डाण करते; आणि तासाभराने याब्रीलच्या नेतृत्वाखालील दहशतवादी टोळी त्या विमानाचा ताबा घेऊन प्रवाशांना धमकावते.'' कोणीही हालचाल करू नका.'' विमान अरब राज्य शेरहबेन कडे वळवण्याची पायलटला आज्ञा देण्यात येते. शेर हबेनला पोचल्यावर अपहरणकर्ता याब्रील थेरेसाला सांगतो, ''लक्षात ठेव, तू माझ्या ताब्यात आहेस. माझ्या मागण्या मान्य न केल्यास दर तासाला एकेका ओलीसाला ठार मारण्यात येईल पहिला नंबर तुझा.'' थेरेसा म्हणते, ''माझ्या दोन चुलत आजोबांना तुझ्यासारख्या माणसांनी मारले. आमच्या कुटुंबाला सतत मृत्यूची सोबत असते. माझे वडील अध्यक्ष झाले तेव्हापासून माझी काळजी करतात. तू असा खलनायकासारखा का वागतोस? एका तरुण मुलीला मारलं तर संपूर्ण जग भयग्रस्त होईल असं तुला वाटतं?''

अपहरणकर्ता याब्रील तिला म्हणतो, ''तुला माझ्यापासून धोका नाही. ते तडजोड करतील. आपल्या दोघांचं बोलणं म्हणजेच वाटाघाटी.'' विमानाच्या अपहरणाची बातमी पोचताच सी आय ए वगैरे सक्रिय होतात. व्हाइट हाऊसमधील बैठकीत विमानाची फिल्म दाखवली जाते. पहिले शंभर किंवा हिंसक ख्रिस्त चा आंतरराष्ट्रीय दहशतवाद्यांचा गट या अपहरणकर्त्यांना पैसा पुरवत असून निरनिराळ्या देशातील क्रांतिकारी गटांच्या परस्परसहकार्याने त्यांचे काम चालते; अशी माहिती देण्यात येते.

प्रेसिडेंट फ्रान्सिस केनेडी थेरेसाला सोडवण्यासाठी काय करता येईल त्यावर सल्लामसलत करतात. शेरहबेन राज्यात अमेरिकेचा तेल सम्राट ॲडिक याचे बिलियन डॉलर्स गुंतलेले असतात. त्यामुळे त्या शहरावर बॉंब वर्षाव करणे शक्य नसते. राष्ट्राध्यक्षाचा तो सर्वात मोठा शत्रू असतो; परंतु तरीही त्याला राष्ट्राध्यक्षांच्या भेटीला आणण्यात येते. या प्रसंगात आपण सर्व अमेरिकन एक आहोत असे तो म्हणतो. अपहरणकर्त्यांच्या मागण्या मान्य केल्याने थेरेसाला कसलाही धोका पोचणार नाही'' असे तो सांगतो.

त्याच वेळी पोपची हत्या झालेली असते आणि वॉशिंग्टनवर ॲटम बॉंब टाकण्यात येईल अशी धमती देणारे एक पत्र एफबी आयला देण्यात येते. पोपचा मारेकरी अमेरिकेत पोचल्यावर त्याच्या सुटकेची मागणीही दहशतवादी करतात. तेव्हा या घटनांचा परस्परांशी संबंध आहे का असा प्रश्न निरर्थक ठरतो. शेरहबेनच्या सुलतानाचा 'पहिल्या शंभर' गटाशी असणारा संबंधही सर्वांना कळून चुकतो.

याब्रील इकडे विमानातील थेरेसाला सांगतो, ''मेकअप कर. दूरदर्शनचे कॅमेरे आपली वाट पाहत आहेत. सर्व जग आपल्याला पाहणार. मी तुला त्रास देतो असे प्रेक्षकांना वाटता कामा नये.''

कॅमेऱ्याच्या समोर तिला उभे केले जाते आणि याब्रील तिच्या उघड्या पडलेल्या मानेवर पिस्तूल ठेवून त्याचा चाप ओढतो. ती हवेत तरंगू लागते. खाली आदळते. याब्रील म्हणतो, ''आता जगाला कळेल आम्ही किती भयानक आहोत. आता आम्ही मागू ते देतील.''

राष्ट्राध्यक्ष केनेडी यांना कन्येच्या मृत्यूचा धक्का बसतोच. ते भयंकर संतापतात.

पण लगेच शांत होतात. सल्लागारांच्या बैठकीत ते सांगतात, ''यानंतर होणाऱ्या मोठ्या बैठकीत मी काय बोलणार आहे ते तुम्हांला सांगतो. मी सल्ला मागत नाही. तर मला तुमचा पाठिंबा हवा आहे. माझा निर्णय कुणाला योग्य वाटला नाही तर त्यांनी बैठकीला जाण्यापूर्वी राजीनामा द्यावा.'' ख्रिश्चन क्ली, आर्थर विक्स, युजीन डॅझी अणि ऑडब्लड ग्रे हे चौघे राष्ट्राध्यक्षांचे निकटवर्ती विश्वासू वरिष्ठ अधिकारी. चर्चेशिवाय पाठिंबा किंवा राजीनामा असा पर्याय पाहून त्या प्रत्येकाची प्रतिक्रिया आरंभी गोंधळाची - पण नंतर केनेडीबरोबर राहण्याची अशीच प्रकट झाली.

राष्ट्राध्यक्ष कॅबिनेटच्या बैठकीत आपला निर्णय जाहीर करतात. सुलतान आपल्याला मदतीचं नाटक करीत प्रत्यक्षात कटात सामील आहे. ओलीस प्रकरणावरून अमेरिकेची मानखंडना करण्याचा हेतू स्पष्ट दिसतो. अपमानास्पद अटी स्वीकारण्याची माझी तयारी नाही. माझा आदेश आहे की शेरहबेनच्या तेलक्षेत्रावर हवाई हल्ले करा. चार तास आधी नागरिकांना शहर सोडण्याची सूचना देणारी पत्रके टाका. तेलीच्या विहिरी, पाइप लाइन्स सर्व उद्ध्वस्त करा. हा हल्ला बरोबर छत्तीस तासांनी व्हायला हवा. शेरहबेनच्या राजदूताला माझ्या भेटीला लगेच पाठवा. त्याला मी सांगणार आहे. ओलीसांना उद्या दुपारपर्यंत येथे पाठवा, याब्रीललाही जिवंत येथे आणून पोचवा. नकार दिल्यास तेलक्षेत्र म्हणजे डोक शहर जमीनदोस्त होईल.''

मंत्रीमंडळाचे सदस्य त्यावर आक्षेप घेऊ पाहतात, पण राष्ट्राध्यक्ष त्यांना ठणकावून सांगतो, ''देशाचा प्रमुख कार्यकारी अधिकारी म्हणून मी हे निर्णय घेतले आहेत. तुम्ही सर्वजण कामाला लागा. कामाची प्रगती माझ्या मुख्य अधिकाऱ्याला कळवत राहा.''

सभापती केनेडींना म्हणतो, ''काँग्रेस व सिनेट तुमच्या कृतीला अटकाव करण्यासाठी आजच सर्वतोपरी प्रयत्न करील. वैयक्तिक दु:खाचा संबंध असल्याने याबाबत कोणताही निर्णय तुम्ही घेणे अयोग्य आहे.''

राष्ट्राध्यक्ष त्याला सुनावतात, ''तुम्ही तसं करा आणि स्वत:ला व अमेरिकेला संकटात टाका.''

- पहिल्या शंभर पानात हे एवढे कथासूत्र आले आहे. पुढच्या दोनशे पृष्ठात या कथासूत्राने वेगवेगळी अत्यंत रोमांचकारक अशी वळणे घेतली आहेत. अमेरिकेतील प्रमुख राजकीय नेते व सिनेट सदस्य, बडे उद्योगपती, हे सॉक्रेटिस क्लबचे सदस्य असतात. स्थावर मालमत्ता, प्रसारमाध्यमे, सिनेमा व अफाट शेतजमिनीचे मालक - वर्षातून चार वेळा एकत्र येतात; एक आठवडाभर एकत्र राहून विविध विषयांवरील अद्ययावत प्रगतीचा मागोवा घेतात. देशाच्या दृष्टीने धोरणात्मक दिशा ठरवतात. या क्लबच्या सदस्यांनाही राष्ट्राध्यक्षांच्या निर्णयाने हादरा बसतो.

''अमेरिकेच्या अध्यक्षांचे कार्यालय म्हणजे लोकशाही मार्गातील मोठा धोका ठरला आहे,''

''हा मूर्खपणा आहे. योग्य कारणाशिवाय लष्कर कृती करणार नाही,''



''फार भयानक निर्णय आहे. पुढील अनेक वर्षे परराष्ट्र संबंध बिघडलेले राहतील.''

''असा विध्वंसक निर्णय घेणाऱ्या व्यक्तीचा मानसिक तोल ढळलेला आहे असा दूरचित्रवाणीवर मी प्रचार करतो,'' असे टीव्ही केंद्रांचा मालक सांगतो.

''केनेडीची ही चाल अपयशी ठरावी असं कोणाही अमेरिकेन माणसाला वाटणार नाही, केनेडी दूरदर्शनच्या पडद्यावर जादूगार बनतो. त्यानी आपली बाजू मांडली तर काँग्रेस अडचणीत येईल. ओलीसांची सुटका झाली तर त्यांची लोकप्रियता अधिकच वाढेल.''

अशी वेगवेगळी मते त्याच्या निर्णयावर प्रकट होतात.

- अमेरिकेतील इतर सत्ताकेंद्रेही या निर्णयाने हादरतात. सर्व राजकारण ढवळून निघते.

मारिओ पुझो या कथासूत्राला अनेक उपकथानकांची जोड देतो. मानवी स्वभावाचे वैचित्र्य दाखवतो, वेगवेगळ्या सत्ताकेंद्रांच्या सामर्थ्याची चुणूक दाखवतो. संसद, न्यायालय, गुप्तहेर यंत्रणा, अतिरेकी संघटना या सर्वांच्या कार्यपद्धतीचे बारकावे प्रकट करतो. याब्रील आणि राष्ट्राध्यक्ष यांची खुद्द व्हाइट हाऊसमध्ये भेट घडवून आणतो, '' माझं मन तुझ्या मनासारखंच आहे. त्यामुळे तुझ्याशी बोलून पुढची पायरी टाळायची आहे '' असेही केनेडी त्याला सांगतात.

याब्रील त्यांजपुढे आपले मन मोकळे करतो, ''तुमच्या मुलीचा मृत्यू आवश्यक होता. ती म्हणजे अमेरिकेचे प्रतीक. पृथ्वीवरील सर्वात शक्तिशाली सत्ताधीशाची कन्या.... पोपचा मृत्यू झाला. तुमच्यावर दबाव येऊन मला मोकळे केले गेले तर तुम्ही आणि तुमची अमेरिका जगाच्या नजरेत षंढ ठराल. तुमच्या सामर्थ्यशाली प्रतिमेला हादरा बसेल.''

तो असेही सांगतो, ''प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध क्रांती करण्यासाठी मी माझं आयुष्य समर्पित केलं आहे. मी मेलो तरी मी केलं ते योग्य होतं हा माझा विश्वास कायम राहील.''

राजकारणातले निर्णय कधीच सरळ रेषेत जाणारे नसतात. त्यात अनेक गुंते असतात. अनेक पैलू असतात, आणि परिणामांचीही नेमकी कल्पना करता येतेच असे नाही. मारिओ पुझो त्यातीलही अनेक बारकावे प्रकट करून चकित करतो.

- गॉड फादर, द सिसिलियन यासारखीच ही कादंबरीही वाचकांना थरारून टाकणारी आहे.

**पृष्ठे ३०४ दोनशे रुपये सवलतीत रु.१७०,**
**सभासदांना रु.१५०,पोस्टेज रु.१५.**

## *भैरवी (नाटक)*

### लेखक - प्रा. दिलीप परदेशी

**कुटुंबप्रमुखाच्या छंदाच्या अतिरेकाने जेव्हा सर्व कुटुंबाला झळ पोचते**

एखाद्या व्यक्तीच्या छंदामुळे सगळे घरच कसे उद्‌ध्वस्त होते याचे काहीसे मेलोड्रॅमॅटिक चित्र प्रा. दिलीप परदेशी यांनी भैरवी या नाटकात उभे केले आहे.

आरंभीच राजा केळकर म्युझियमचे संस्थापक दि. गं. केळकर यांची आठवण दिली आहे. त्यांचा मुलगा राजा आजारी होता. त्याच्यासाठी औषधे आणण्याकरिता त्यांच्या पत्नीने आपला एक दागिना दिला. तो दागिना विकून पंधरा रुपये आले. वाटेत एका ठिकाणी जुन्या वस्तूंचा लिलाव चालला होता. पेशवेकालीन झुंबरावर बोली चालली होती. दि. गं. केळकर यांनी पंधरा रुपये बोली केली आणि ते झुंबर त्यांना मिळाले. औषधाऐवजी ते झुंबर घेऊन स्वारी घरी आली. त्यांच्या पत्नीने म्हटले, ''झुंबर आणलंत? बरं केलंत. त्याचे दोन लोलक द्या. ते कुटून एक मी खाते. एक तुम्ही खा. कारण आपला मुलगा औषधावाचून मरेल.'' मुलाचे त्या आजारात निधन झाले. त्याचे शल्य दि. गं. केळकरांना बोचत राहिले. म्हणून त्यांनी आपल्या म्युझियमला मुलाचे नाव दिले.

जुन्या दुर्मिळ रेकॉर्डस जमवण्याचा असाच अफाट छंद असणाऱ्या आनंदच्या परिवाराची होणारी दुरवस्था प्रा. परदेशी यांनी नाट्यरूपात पेश केली आहे. आपला सगळा पगार तो जुन्या रेकॉर्डस वाटेल त्या भावाने खरेदी करण्यात खर्च करीत असतो. घरात एक पैसाही देत नाही. त्याची बायको रागिणी नोकरी करून घर चालवते. आनंदचा धाकटा भाऊ बाबू कॉलेजात जाणारा. अभ्यासात हुशार, पण तब्येतीची सदैव कुरकुर असणारा. बेबी ऐन विशीतली; मॅट्रिकला दोनदा नापास झाल्याने घरीच बसून असलेली. तिला चित्रपटाचे वेड हिरॉइन व्हायची स्वप्ने सतत बघणारी. आणि वडील अप्पा ज्ञानेश्वरीची पारायणे करणारे. दर शनिवारी भजनी मंडळ घरी भरवणारे. जुन्या रेकॉर्डस विकणारा सोनी वरचेवर आनंदकडे येऊन बेबीला हिरॉइन बनवण्याची आश्वासने देतो. ती त्याच्या भूलथापांना बळी पडते. रागिणी या सर्वांवर मायेची पाखर घालते. नोकरी सांभाळून घर चालवते. सर्वांचे हवे नको बघते. परंतु तिच्या एकटीच्या पगारात भागत नाही. कर्जासाठी सावकार






अधूनमधून तगादा लावतो.

मध्येच कधीतरी आनंदला उपरती होते. पहिल्या तारखेला मिळालेला पगार तो बायकोच्या हाती देतो. तिला धन्यता वाटते. पण त्याचवेळी सोनी दोन दुर्मिळ रेकॉर्डस घेऊन येतो; आणि ती पगाराची रक्कम पुन्हा गायब होते.... बेगम अख्तरचा जुन कर्णेवाला फोनो विक्रीला येतो. तो घेण्यासाठी त्याची चुळबुळ चालते. आपला संग्रह विकायला तो तयार होतो. पण त्याला अगदीच कमी किंमतीची ऑफर येते. त्यामुळे तो संभ्रमात पडतो.

सिनेमाच्या स्वप्निल दुनियेत रंगणारी बेबी आपण गरोदर आहो हे जाणवल्यावर हादरते. रागिणी तिला माहेरी नेऊन सोडवण्याचे ठरवते. पण त्या आधीच रेल्वे रुळावर धावत्या गाडीखाली उडी घेऊन बेबी मरण पत्करते...

बाबू परीक्षेत नंबर मिळवतो. परंतु निकाल चांगला लागूनही त्याची तब्येत बरोबर नसल्याने चक्कर येऊन पडतो. त्याच्या औषधासाठी रागिणी आपले दागिने आनंदजवळ देते. आनंद ते दागिने विकून टाकतो; पण औषधे आणण्याऐवजी तो बेगम अख्तरचा कर्णेवाला फोनो घेऊन येतो.

तेव्हा रागिणी वेड लागल्यासारखी हसू लागते. ''छान केलंत. फार चांगलं केलंत. ती रेकॉर्ड लावा.... सगळ्याच रेकॉर्ड एकदम लावा.'' आणि ग्लानीने तिची मान मागे ढळते. विस्फारलेल्या नजरेने आनंद तिच्याकडे बघत राहतो. ''वो जो हममें तुममें करार था - तुम्हें याद हो के न याद हो -- '' भैरवीचे सूर वातावरणात दरवळत राहतात.

एका कुटुंबाची ही दयनीय अवस्था होण्याला कुटुंबप्रमुखाचा छंद कारणीभूत झाला असा ढोबळ निष्कर्ष काढण्यासाठी किंवा तसा संदेश देण्यासाठी हे नाटक आहे असे मात्र नाही. त्यात मानवी स्वभावाचे अनेक पैलू प्रकट झालेले आहेत. बेबीचे चित्रपटांच्या मायावी दुनियेतले हरवणे, दीरावर अकृत्रिम मायेची पाखर घालणाऱ्या रागिणीचे वात्सल्य, बेबीला भुरळ घालण्याचा सोनीचा बनेल आटापिटा, बेबीच्या आत्महत्येनंतर अप्पांना आलेले औदासिन्य, आपल्या छंदामुळे सबंध घराला भोगावे लागणारे हाल पाहून आनंदला होणारी क्षणिक उपरती, अति झाले आणि हसू आले असा शेवटी होणारा रागिणीच्या सहिष्णुतेचा स्फोट - ह्या सर्व घटनांतील नाट्यात्मक क्षमतांचे भान ठेवून दिलीप परदेशी यांनी रंगमंचावर हास्य व गांभीर्य यांची जुगलबंदी रंगवली आहे. आनंदच्या एकांतिक छांदिष्टपणामुळे घराची वाताहत होते एवढेच सूत्र प्रभावी ठरवणारा नाट्यानुभव या नाटकातून प्रेक्षकांना लाभतो. बेबीचे भाबडेपण, मोहपाशात पडणे, गरोदर राहणे हे सर्व स्वीकारूनही रागिणी तिला त्यातून सोडवण्याचे ठरवते. पण त्या आधीच बेबी अनपेक्षितपणे आत्मघात करून घेते; बाबू परीक्षेत पहिला येतो पण आजाराने खाली कोसळतो यासारखे मेलोड्रॅमॅटिक प्रसंग या नाट्याला उठाव देतात. आनंदच्या छांदिष्टपणामुळेच त्यांच्यावर ही आपत्ती ओढवते असे नाही. कथानकात अशा विविध प्रकारच्या प्रवाहांचा संकर होणे आवश्यक आणि अपरिहार्यच असते. प्रा. परदेशी यांचा रोख मात्र मुख्यतः आनंदच्या छांदिष्टपणावर आहे; त्या छंदापोटी इतर सर्व बाबींकडे दुर्लक्ष करून तो स्वतःच्याच दुनियेत हरवून जातो. हे चांगल्या प्रकारे वेळोवेळी जाणवून दिले आहे. त्यामुळे आनंदची व्यक्तिरेखा प्रेक्षकांना लक्षवेधक वाटेल. समंजस रागिणीमुळे त्या घराचे घरपणही मनावर ठसते.


**पृष्ठे ७२. पन्नास रुपये सवलतीत रु.४३, सभासदांना रु.३८,पोस्टेज रु.१५.**

# जर्नी टू द हार्ट

व. पु. काळे

एक श्रीमंत आणि उदार माणूस बोरवारा इथं राहत होता. एका अज्ञात परिवारात त्याचं स्थान अगदी वरच्या पातळीवर होतं, म्हणून त्या अज्ञात जगाचा तो प्रेसिडेण्ट मानला जातो. दर दिवशी तो कोणत्या तरी एका परिवारात सोनं-नाणं दान करीत असे. कधी व्याधिग्रस्त लोकांना, तर कधी विधवांना पण आपण होऊन मागणाऱ्यांना तो काहीही देत नसे.

एके दिवशी काही वकिलांना त्यानं मदत करायचं ठरवलं. एका वकिलानं आपण होऊन मागणी केली. त्याला काहीही मिळालं नाही. दुसरा दिवस खास अपंगांसाठी होता. तेव्हा त्या वकिलानं हात तुटलेला दाखवला. पण प्रेसिडेण्टनं दुर्लक्ष केलं. वकिलानं अनेक प्रयत्न केले. बुरखा पांघरायलाही मागेपुढे पाह्यलं नाही, तरी यश मिळालं नाही. शेवटी तो वकील स्मशानात गेला. तिथल्या रखवालदाराकडून त्यानं स्वत:ला प्रेतवस्त्रात लपेटून घेतलं. 'कदाचित इथून जाताना,त्या सम्राटाला कीव येऊन त्यानं काही नाणी माझ्या प्रेतावर टाकली, तर आपण दोघात वाटणी करू.' असं त्या वकिलानं रखवालदाराला सांगितलं. त्याप्रमाणे घडलं. प्रेसिडेण्टनं एक सोन्याचं नाणं फेकलं. रखवालदार ते अगोदर पळवेल, ह्या भीतीपोटी, वकिलानं पटकन् हात बाहेर काढला. ते नाणं मुठीत घेऊन तो त्या सम्राटाला म्हणाला, 'शेवटी तुझ्याकडून देणगी मिळवण्यात मी यशस्वी झालो.'



प्रेसीडेण्ट म्हणाला, 'माझ्याकडून तू काहीही मिळवू शकणार नाहीस. माझ्याकडून काही मिळवण्यापूर्वी तुला अगोदर मरावं लागेल.'

ह्यावरूनच एक वाक्प्रचार अस्तित्वात आला. 'माणसानं मृत्यू येण्यापूर्वी मरावं. इनाम किंवा भेटवस्तू त्यानंतर मिळते. पण मृत्यूपूर्वीचं मरण सुद्धा कुणाच्या तरी मदतीशिवाय मिळत नाही.'

ही एक सूफीकथा आहे. वरवर पाह्यलं, तर कथा अगदी साधी वाटते. पण एकेक परिच्छेद घेतला, एकेका शब्दाचं पृथ:करण केलं, तर अर्थाचे शब्दकोश सापडतील. 'मृत्यू येण्यापूर्वी माणसानं मरावं'एवढं एकच विधान आत्ता गूढ वाटतं. पण जेव्हा



एकेका वाक्याचं अध्ययन सुरू होईल तेव्हा ध्यानात येतं की, प्रत्येक शब्द योजनापूर्वक वापरला आहे. आपण एक हकीकत किती वरवरच्या अर्थानं वाचली, हे नंतर कळतं. जत्रेत कधीकधी टेबलटेनिसच्या बॉलच्या आकाराएवढा गोल मिळतो. ता साधा बॉलच वाटतो. पण त्याच्या आतून आणखी एक बॉल निघतो. ते दोन अर्धगोल विलग केले की त्याच्या आत आणखी एक. प्रत्येकाचे रंग वेगवेगळे. सर्वात शेवटी एक गोटीच्या आकाराचा अभंग बॉल मिळतो.

सूफी कथा अशाच असतात.

काही काही शब्द फार आकर्षक असतात. आपण त्यांच्यावर मोहित व्हावं, असे असतात. अनेक जणांकडून, गप्पागोष्टीतून मी त्यांचे त्यांचे आवडते शब्द ऐकले आहेत. मी केव्हातरी एकदा 'सूफी फकीर' असा शब्द ऐकला. 'फकीर 'शब्द नवा नव्हता. 'सूफी'शब्द वेगळा वाटला. ह्या शब्दात काहीतरी भव्य, विराटशक्ती किंवा शब्दात व्यक्त करता येणार नाहीव असं वैभव, समृद्धी आहे, असं वाटत राह्यलं. कुणीतरी अर्थ सांगितला. 'परमेश्वराच्या अस्तित्वावर श्रद्धा ठेवणारा मुसलमानी साधू.'

एवढ्या किरकोळ व्याख्येत 'सूफी' शब्द बसवावा, असं वाटेना. शोध चालू होता. माझा एकट्याचाच शोध चालला होता. शब्दानं माणसाचा शोध घ्यावा, हे ऐकायला चमत्कारिक वाटतं. पण तसं घडतं. मनातले सगळे भाव आपण शब्दांतून जेव्हा प्रकट करण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा चाललेली आपली केविलवाणी धडपड आठवून पहावी. शब्दार्थाच्या पातळीवर जोपर्यंत संवाद आहे, तोपर्यंत फारसा प्रश्न नसतो.

'गाडी राईट टाईम आली का?'

'अरे, दहा मिनिटं बीफोर टाईमच आली.'

'घाटात पाऊस होता का?'

'पाऊस नव्हता, पण.....

'पाऊस नव्हता' इथपर्यंतचा संवाद शब्दार्थावर चालला होता. 'पण'.... ह्यानंतर जे काही सांगायचं होतं, तेच खरं महत्त्वाचं होतं. सांगणाऱ्या माणसाच्या मनात रेंगाळत होतं. सुखवत होतं.

'पण काय? बोल ना'.

'पाऊस नव्हता, पण धुकं किती होतं म्हणून सांगू ? त्यात मधूनच दिसणारी शिखरं, पांढरे शुभ्र स्फटिकासारखे झरे....

भावार्थाच्या प्रांतात गेलं, की शब्दांचे पुतळे होतात. ऐकणारा जर म्हणाला, 'दर पावसाळ्यात मी, पुण्याला काही काम नसलं तरी केवळ हे घाटातलं वैभव पाहण्यासाठीच जातो.'

सांगणारा शांत होतो. ह्या उलट ऐकणारा म्हणाला, सगळं आयुष्य नागपुरात गेलं. पावसाळ्यातला खंडाळा- लोणावळा कधी अनुभवला नाही. योगच नाही आला.'

आता सांगणारा काय सांगेल ? जास्तीत जास्त तो म्हणेल,'उद्याच्या उद्या जाऊन ये. हवं तर प्रवासखर्च मी करतो. पण हा अनुभव प्रत्यक्ष तू घे.'

संवादाच्या कोणत्यातरी टप्प्यावर जाणीव होते की शब्द अपंग आहेत. तो कोणी एक मुद्दाम पुण्यापर्यंत जाऊनही येईल. अनुभव घेईल. पण वेदना त्याच्या असतील. माझ्यातला बघणारा त्याच्यात जाईल का ? तो माझ्याइतका भारावेल का?

माणूस किती एकटा असतो, हे अशा क्षणी जाणवतं. शब्दातला फोलपणा मानगुटी बसतो. मग एखादे वसंत बापट, दख्खन राणीच्या बसून कुशीत कवितेत निसर्गाशी एकरूप झालेल्या बेबीला आपल्यासमोर आणतात. अशा निर्मितीला वेळी शब्द, भावांचे-भावनांचे कोष पोटात घेऊन योग्य प्रतिभावंताकडे जातात. गदिमांकडे तर वल्मीकींनी शब्दांची फौजच पाठवली होती. कृष्णापासून थेट, बुद्ध, महावीर, अष्टावक्र, ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम, कबीर असं करीत करीत थेट ओशोंपर्यंत शब्दांचं पायदळ शोध घेत आलं. प्रतिभावंत आणि व्यासंगी, बहुश्रुतांची नावं सांगू लागलो, तर ती यादी पण मोठी आहे. दुर्गाबाई भागवत, शेवाळकर, शांताबाई शेळके, अरुणा ढेरे ह्यांना शब्दप्रभू न म्हणता भावप्रभू म्हणावं.

त्या प्रचंड सैन्यातला एक भावसैनिक ओशोंनी माझ्याकडे पाठवला. 'सूफी' ह्याचा नेमका अर्थ तो शब्द मला सांगणार होता. त्या सैनिकानं माझ्या हातात एक ग्रंथ ठेवला. त्याचं नाव होतं,'जर्नी टू द हार्ट.' 'कट्यार काळजात घुसली' हे नाटकाचं शीर्षक, मस्तकात न जाता जसं काळजातच जातं, त्याप्रमाणे 'जर्नी टू द हार्ट हे नाव त्याच्या 'अंत:करण' ह्या जन्मगावी पोहोचलं. तसं म्हणाल तर, माझ्या मते, 'कट्यार काळजात घुसली' हे करकरीत, रुक्ष शब्द आहेत. दंग्यात चारपाच माणसं मारली गेली. हकया विधानासारखं, बातमी देणारं वाक्य वाटतं. ह्याउलट 'लागी कलेजवाँ कटार' हे शब्द नुसते लिहिले तरीही वसंतराव देशपांडे जखमी, अगतिक आवाजात ती ओळ कानात गुणगुणून जातात. त्याहीपेक्षा  वसंतरावांच्या आवाजातलं गारूड असं की, 'जखम' म्हणताक्षणी रक्ताची धार नजरेसमोर येत नाही. घायाळ मनाची बोच, आर्जव आणि लडिवाळ तडफड ऐकू येते. 'ही जखम व्हायला हवी होती' ह्याची खूप काळ केलेली प्रतीक्षा समोर येते. दारव्हेकरांना हेच सांगायचं होतं, हे वसंतरावाची चीज तुमच्यापर्यंत  पोहोचवते. तो वसंतरावांचा आर्त स्वर, शब्दांचा कोष फोडतो आणि त्यातल्या भावाचा प्रवास, अंत:करणाच्या केंद्रबिंदूकडे सुरू होतो.

त्याच केंद्रापाशी 'सूफीझम' आहे. 'सूफीझम' ह्या शब्दासाठी मी कोणताही पर्यायी शब्द वापरणार नाही. 'कट्यार काळजात घुसली' पेक्षा 'लागी कलेजवाँ कटार' ह्यात जास्त माधुर्य आहे. मातृभाषेच्या अट्टाहासासाठी मी माधुर्याचा बळी देणार नाही. कारण माधुर्य हाच सूफीझमचा आत्मा आहे.

सूफीझम हा मुळातच धर्म नाही.

(क्रमश:)

## आवर्जून वाचावें असें कथा वाङ्मय

### निसटलेले

स्त्री- पुरुष संबंधातील शोध हा न संपणारा आहे. माणसाचे मन हा विषयच कधीही तळ न सापडणारा असा. त्यात स्त्री-पुरुष नाते हे कितीतरी वेगळ्या पातळीवर असणारे. या नात्यांना समजून घेऊन त्याप्रमाणे वागताना मनात असलेले खूप काही क्षण निसटून जातात. हे निसटलेले क्षण मनाच्या तळात सुखरूप असतात. असे निसटलेले क्षण माणसाला अनुभवता येतात. पण सर्जनशील कलाकाराला अचूक,मार्मिक शब्दात साकारताही येतात. आशा बगेंनी हे निसटलेले क्षण कथासप्तकात सादर केले आहेत. या सर्व कथांमध्ये आशा बगेंची एक खास भाषाशैली आहे. गुंतागुंत, उकल,निराकरण अशा पायऱ्या किंवा सनसनाटी घटना या सगळ्याच पायऱ्या ओलांडून या कथा एका उंचीवर पोहोचतात.



नातेसंबंध जपताना निसटलेले क्षण उलगडणाऱ्या भावस्पर्शी कथा.

**किंमतः १००रु. सवलतीत : ८५रु. सभासदांना : ७५रु. पोस्टेज : १५रु.**


### ऋतुवेगळे

**चाकोरीबाहेरील अनुभवांना समर्थपणे अभिव्यक्त करणाऱ्या कथा-**

आशा बगे यांनी कथाकार म्हणून स्वत:ची काही वैशिष्ट्ये सिध्द केली आहेत.कोणताही अभिनिवेश नसतानाही त्यांच्या व्यक्तिरेखा ठाम आणि प्रखर आत्मभान असणाऱ्या असतात. ताठ कण्याच्या व्यक्तिरेखा त्यांच्या कथांमध्ये वावरताना दिसतात. जीवनानुभवाचे नेमके आकलन, सफाईदार व्यक्तिरेखा चित्रण, सहजसुंदर भाषाशैली, ठाम, मूल्याधिष्ठित जीवनदृष्टी आणि



व्यक्तिमनाच्या भावस्पंदनाचा मागोवा घेण्याची कसोशी ही आशा बगे यांच्या कथालेखनाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.स्त्रीच्या भोवती तिला वेढून असणाऱ्या कुटुंब जीवनातील विविध अनुभवांचे कोपरे त्या तपासताना दिसतात. सण, रिवाजांची नेमकी माहिती, संगीताची जाण, घरगुती संवादाची भाषा यातून जिवंत वातावरण निर्मिती त्यांच्या कथांमध्ये नेहमीच उमलून येताना दिसते.




आशा बगे यांच्या या सर्व वैशिष्ट्यांची उजळणी करणारा त्यांचा नवीन कथासंग्रह 'ऋतुवेगळे' हा आहे समर्थ व्यक्ति रेखा चित्रण आणि अनुभवाचे वेगळेपण हे या कथांचे वैशिष्ट्य आहे. तसेच साम्य आहे. आशय-विषयाच्या दृष्टीने मात्र प्रत्येक कथा एक दुसरी पासून वेगळी आहे. अनुभव विश्वाचे वेगवेगळे ऋतू रंगवणारा हा 'ऋतूवेगळा' कथासंग्रह आपले शीर्षक सार्थ ठरवणारा आहे.

**किंमतः ६०रु. सवलतीत : ५१रु. सभासदांना : ४५रु. पोस्टेज : १५रु.**

### मुले आणि पाळे

**मानवी नात्यांच्या अस्तित्वाचा शोध -**

मनुष्य जन्म होतो तोच मुळी अनेक नात्यांना जन्म देऊन. जन्माबरोबरच अनेक रक्ताची नाती सोबत येतात. या जन्मज नात्याखेरीज मनुष्य जसाजसा मोठा होत जातो, तसतसे रक्ताचे नसलेले पण अतिशय घट्ट असे नवे नातेसंबंध निर्माण होत जातात. नवे नाते जीवनात पाळेमुळे पसरु लागतात. जीवनातील सगळेच नातेसंबंध प्रेमपूर्ण असतातच असेही नाही. आशा-निराशा, प्रेम-प्रतारणा, आकार-विकार, खरे-खोटे चेहरे असे चक्रावून टाकणारे, निराशा करणारे अनुभव देखील वाट्याला येतात. तरीही नात्यांमुळेच मानवी जीवनाला अस्तित्व आणि अर्थ मिळतो. निर्माण झालेल्या नात्यांना दृढतेचे,भावनांचे आणि निष्ठांचे टेकू दिले तर नाते संबंध किती उंचीवर जाऊन पोहोचू शकतात,अशा नातेसंबंधाचा सखोल वेध आपल्या कथांतून वसंत नरहर फेणे यांनी घेतलेला आहे. सर्व कथांचे आशयसूत्र एकच आहे. मात्र आविष्कार वेगवेगळे आहेत.




**किंमतः ८०रु. सवलतीत : ६८रु. सभासदांना : ६०रु. पोस्टेज : १५रु.**

# फुले आणि काटे

## रहस्यकथांचे रोमांचकारक विश्व

बाराशेवर रहस्यकथा लिहून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये स्थान मिळवणारे बाबूराव अर्नाळकर यांनी निर्माण केलेले धनंजय छोटू, काळापहाड झुंजार-विजया, मृत्युंजय-चंदू वगैरे मानसपुत्र अजूनही वाचकांच्या स्मरणात आहेत. काही धनंजयकथांना चित्रपटाचे माध्यमही लाभले. काळापहाडने त्या काळी संपूर्ण पोलिसखात्याला आव्हान दिले. अर्नाळकरांच्या कथांमधील व्यक्तिरेखाटन, स्थानविशेष व कल्पकता दाद देण्याजोगी होती. मोटारीत टेलिफोन असणे, लिफ्टने सहाव्या मजल्यावर मोटारकार नेणे यासारख्या आजच्या काळात शक्य झालेल्या कल्पना अर्नाळकरांनी १९४२ सालापासून लिहिलेल्या रहस्यकथांमध्ये वापरल्या, आजच्या काळात भारतीय समाजाला परिचित असणारी खाजगी गुप्तहेर ही संकल्पनाही अर्नाळकरांच्या कादंबऱ्यांमध्ये दिसते. ''तुझ्या पुस्तकातून तू नव्या पिढीला पराक्रमी, बुद्धीमान आणि चारित्र्यवान बनवण्याचे धडे देत आहेस.'' अशा शब्दात स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी अर्नाळकरांचे कौतुक केले आणि एका परीने अर्नाळकरांचे जे सामाजिक वास्तवाचे भान होते, त्याकडेच लक्ष वेधले.

अर्नाळकरांच्या लेखनातील रहस्य आणि ना. सी. फडके यांच्या लेखनातील शृंगार यांच्या मिश्रणातून एस. एम. काशीकर यांची कथा निर्माण झाली. १९६६ साली पहिली रहस्यकथा प्रसिद्ध झाली. धुमकेतू, सुपरमॅन, नाइट किंग, बहुरूपी, सरदार, सी आय बी वगैरे नायकांच्या बरोबरीने अफाट साहसे करणारी निशाराणी ही नायिकाही काशीकरांनी उभी केली. समाजसेवा, देशभक्ती, राजकारण यांचा दंभस्फोट करणारी कथानके त्यांनी रंगवली.

राजा पारगावकर यांनी १९६१ ते १९९५ या ३५ वर्षात मुलांचे मानसशास्त्र आणि विज्ञान यावर आधारित रहस्यकथा लिहिल्या. त्यांच्या अजगरने अफाट लोकप्रियता मिळवली. सुहास शिरवळकर, रामचंद्र सडेकर, श्रीकांत मुंदरगी, गुलमहमद शेख यांनीही सभ्यपणे वावरणाऱ्या गुन्हेगारांचा पर्दाफाश करून अस्सल गुन्हेगार पुढे आणणाऱ्या कथा लिहिल्या. वाचकांच्या विचारशक्तीला आणि कल्पनाशक्तीला चालना देणाऱ्या व स्वत:चे बुद्धिचातुर्य अजमावण्यास प्रवृत्त करणाऱ्या या रहस्यकथा आहेत.

प्रा. विजया पंडितराव (धनंजय, दिवाळी १९९९)



## माणसाबद्दल खराखुरा जिव्हाळा असणारा लेखकच टिकतो.

ज्या लेखकीय व्यक्तित्वात माणसाबद्दलचे व समाजाबद्दलचे प्रेम उत्कटपणे ओसंडत असते त्याच्या साहित्यात टिकण्याची, विकसित होत जाण्याची बीजे अधिक जोमदारपणे वाढत असतात. हे प्रेम, ही आपुलकी नसेल तर विचाराने समाजाशी असलेली बांधिलकी व्यर्थ ठरते. अधिकांश मार्क्सवादी साहित्याची दारूण शोकांतिका ही की मार्क्सवाद्यांची समाजाविषयीची कळकळ प्रत्यक्ष संवेदनात्मक अंगाने जोरदारपणे प्रकट होत नाही. ही समाजविषयक आंतरिक आपुलकी ओढून ताणून आणता येत नाही. ती आंतरिक आत्मीयता कुटुंबातील व्यक्ती, आसपासची माणसे, समाज, राष्ट्र यांच्याबद्दल असल्याशिवाय वेगवेगळ्या अनुभवांचे स्फुरणच होत नाही. काही लेखक आपल्या व्यक्तिकेंद्राच्या, स्वसंज्ञेच्या बाहेर जाऊच शकत नाहीत. ते प्रतिकारशक्ती असले तर काही स्मार्ट लेखन ते करू शकतात पण त्या साहित्यातील कोरडेपणा लपून राहात नाही.... लेखकाचा जिव्हाळा खराखुरा असेल तर तो वाचकाला जाणवतोच.... सानेगुरुजी, वि. स. खांडेकर यांचा जिव्हाळा वाचकांना प्रभावित करतो. हा जिव्हाळा कुसुमाग्रजांमध्येही होता. सामान्य वाचकाने त्यांना नेहमीच मानाचा मुजरा केला. प्रतिभेचे देणे हे साहित्य व्यापारात महत्त्वपूर्ण असतेच; परंतु त्याच बरोबर माणसाविषयीचा अकृत्रिम जिव्हाळा ही देखील अत्यंत मोलाची बाब आहे. माणसाची नाना रूपे शोधण्याच्या मुळाशी हाच मानवतेचा जिव्हाळा असतो. अन्यथा लेखक स्वत:च्याच रूपांचे दुसऱ्यांवर आरोपण करून काही काळपर्यंत हुशारीने लेखन करीत राहतो; पण त्याच्यातला कोरडेपणा त्याच्या साहित्याला अपेक्षित कस देऊ शकत नाही.....माणसाबद्दलची ही आत्मीयता समाजाच्या भवितव्याशी निगडित असते. आणि माणसामाणसातील संबंधांचा धागा प्रेमाचा, विश्वासाचा आहे हे गृहित धरते. क्रोध, राग, द्वेष, हिंसा, घृणा, ईर्षा, कामलिप्सा, भय, क्रौर्य, सत्ताकांक्षा, हिंस्रपणा यासारख्या भावनांचे चित्रण लेखक करतो; परंतु या भावनांचे समर्थन वा उदात्तीकरण करण्याची किंवा अलिप्तपणे त्यांचे आकार प्रस्तुत करण्याची त्याची भूमिका असेल तर काही काळ कदाचित त्याचे लेखन कौतुकाला पात्र ठरेल; परंतु नंतर पुन:पुन्हा त्या कृतीचे वाचन करावे असे वाचकाला वाटणार नाही. एखादा मोठा लेखक असत् किंवा अशुभाचे वर्चस्व वा विजय दाखवतानाही भावनासंवेदनांची मांडणी अशा प्रकारे करतो की वाचकाची सहानुभूती पराजित शुभाच्या, सत्याच्या बाजूला राहावी. एकूण वाचववर्ग मांगल्याच्या बाजूला उभा राहतो.

डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर (दीपावली, दिवाळी १९९९)

## मुक्तिबोधांचे काव्य: तांडवाचा प्रलयंकार अविष्कार

गजानन माधव मुक्तिबोध यांचं काव्य म्हणजे त्यांच्या भावविश्वातील तांडवाचा प्रलयंकार अविष्कार. त्यांचं काव्य त्यांच्या व्यक्तित्वाच्या सीमा ओलांडून, कमनीयता व संकोच झुगारून

देऊन प्रचंड आवाज करीत तांडव करीत राहते. त्यांच्या भाषेतील विविधता शंखनाद करीत, चीत्कार करीत त्यांच्या मनातील सामाजिक विषमतेवरील, शोषणावरील आपल्या मनात उफाळणाऱ्या ज्वालामुखीतला लाव्हारस शब्दाशब्दात ओतत राहते. त्यांचं काव्य म्हणजे त्यांच्या अंतर्मनाचं प्रतिबिंब असणाऱ्या या कवितेत शाब्दिक अन्वयार्थाच्या पलीकडे जाणारी मनोव्यस्था प्रकट झालेली दिसते. पूर्णरूपेण प्रकृतीशी तादात्म्य होणे, एकरूप होणे म्हणजे काय ते या कवितेत दिसते. आपल्या मनातील चिरंजीव आस्थेला व श्रद्धेला उन्मळून टाकू पाहणाऱ्या सामाजिक दुष्प्रवृत्तींवर मुक्तिबोध प्रचंड गर्जना करीत विद्द्युलतेच्या कट्यारीने वार करू पाहतात; त्यांच्या सृजनशक्तीच्या या अनावर आवेगाचे जे काही परिणाम होतील त्यांचा सामना तुम्हाला किंवा तुमच्या श्रद्धेला करावा लागेल. मुक्तिबोधांना नक्कीच नाही.... मुक्तिबोध. हे मार्क्सच्या विचारांनी प्रभावित होऊन आरंभीच्या काळात समाजजीवनाच्या अरुंद अंधाऱ्या गल्लीबोळातून भयग्रस्त मनाने भटकणारे लेखक होते; परंतु आपल्या जीवनाच्या अंतिम पर्वात ते अधिक काव्यात्मक स्वभावाचे होत गेले; करुणा व भयग्रस्तता यांच्याकडून गांधीवादाच्या प्रभावामुळे ते निर्भयतेकडे वाटचाल करू लागले. सर्जनात्मकतेच्या दृष्टीने ते अधिक परिपक्व होत गेले.

- नरेश मेहता (मुक्तिबोध : एक अवधूत कविता या पुस्तकातून.
अनुवाद- बाळ ऊर्ध्वरेषे, बीमानगर, इंदूर.)



# वाचकांचा प्रतिसाद

❖ ग्रंथजगत म्हणजे आजच्या ज्ञानाचे आणि विद्वतेचे सर्वसमावेशक भांडारच आहे. (ग्रंथजगत इज कॉम्प्रिहेन्सिव्ह ट्रेझर ऑफ टुडेज् नालेज अँड विझडम)

**आर. व्ही. जोशी**

❖ ग्रंथजगतचा प्रत्येक अंक वाचनीय आणि माहितीपूर्ण असतो. साहित्यविषयक ताज्या घडामोडींची कल्पना त्यावरून येते. पुस्तक परिचयामुळे कोणती पुस्तके आवर्जून वाचावी हे रसिक याचकांना सहज कळते. एकूणच अंक छान.

**रजनी हिरळीकर, कोल्हापूर.**

❖ मराठी ग्रंथजगतचा नूतन अंक मिळाला. दिल्लीतील चर्चासत्रात अनिल मेहता यांनी मराठीचे प्रतिनिधित्व केले याचा आनंद वाटला. त्यांच्या भाषणाचा सारांश नॅशनल बुक ट्रस्टच्या संवाद या हिंदी वार्तापत्रात मला वाचायला मिळाला. तो उद्बोधक वाटला. श्री ओशो यांची पुस्तके मराठीत आणून आपण मोठे काम केले आहे.त्यांचे विचार मननचिंतनाला फार उपयुक्त आहेत. त्याबद्दल आपले अभिनंतन. 'किनारे मनाचे' या शांता शेळके यांच्या संग्रहाच्या निमित्ताने डॉ. प्रभा गणोरकर यांनी प्रस्तावनेत अनेक मुद्दे थोडक्यात पण उत्तमपणे मांडले आहेत. ग्रंथजगतला माझ्या अनंत शुभेच्छा.

**डॉ. वि. म. कुलकर्णी, पुणे ४.**

❖ ग्रंथांविषयी माहिती देणारी मोजकीय नियतकालिके मराठीत निघतात, पण त्यात मराठी ग्रंथजगतचे वैशिष्ट्य विशेष जाणवते. आम्ही प्रथम संपादकीय वाचतो. नंतर नवीन पुस्तकांचे परिचय, साहित्यवार्ता वगैरे. खूप नवीन माहिती व ग्रंथक्षेत्रातील ताजे प्रवाह त्यामुळे लक्षात येतात. 'अणसार' ह्या कादंबरीचा परिचय वाचून ती आम्ही मागवली. ती कादंबरी वाचनीय असून अंतर्मुख करणारी आहे. एका सुंदर गुजराती कलाकृतीचा आस्वाद मराठीतून घेता आला याचा आनंद वाटला.

**सौ. संध्या व व्यंकटेश शिवाजी साळे, रत्नागिरी.**

❖ दिवाळी अंकातील फिनिक्स लायब्ररीचे संस्थापक जे. एन. पौंडा यांच्यावरील लेख आवडला. पोंडा हे आमचे ग्रंथालय असे सदर माणूसमध्ये १९७५ ते १९८१ दरम्यान चालवत होते. त्यात पुस्तकांचा परिचय व अनुषंगिक माहिती देतं. ती मोठी उद्बोधक असे.

**गुरुनाथ कुलकर्णी, कोल्हापूर.**

◆ डिसेंबर १९९९
◆ वर्ष तिसरे
◆ अंक बारावा

# मेहता मराठी ग्रंथजगत

— *अनुक्रमणिका* —

**संपादकीय** ........ २
**साहित्यवार्ता** ........ ६
**पुरस्कार** ........ १२
**लेख - तसलिमा नासरिन - तारा पंडित** ........ १४
**पुस्तक परिचय**
**महात्मा / रविंद्र ठाकूर** ........ २०
**मद्य नव्हे हे मंतरलेले पाणी / संपा. अरुण शेवते** ........ २४
**दिवस फार चांगले आहेत / विद्याधर पुंडलिक** ........ २७
**पर्यावरण संतुलनासाठी हिरवं सोनं / डॉ. सरिता पटवर्धन** ........ ३०
**द फोर्थ के / अनु. वनिता सावंत** ........ ३३
**भैरवी / प्रा. दिलीप परदेशी** ........ ३७
**लेख - जर्नी दू द हार्ट - व. पु. काळे** ........ ३९
**फुले आणि काटे** ........ ४५
**शब्दकोडे** ........ १३
**वाचकांचा प्रतिसाद** ........ ४८

☐ संपादक
सुनील मेहता
☐ कार्यकारी संपादक
शंकर सारडा
☐ संपादन सहाय्य
सुनीता दांडेकर
☐ अंकाची किंमत १० रु.
वार्षिक वर्गणी ८० रु.
☐ वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी
☐ प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

***संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,*** मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव पेठ, धनश्री अपार्टमेंटस्, भावे हायस्कूलजवळ, पुणे-३०.
***मांडणी-अक्षरजुळणी : मेहता पब्लिशिंग हाऊस,*** १२१६ सदाशिव पेठ, धनश्री अपार्टमेंटस्, पुणे-३०. फॅक्स : ०२०-४४७५४६२

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*